
वर्ष : सोळावे
फेब्रुवारी २०२४
अंक : दुसरा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५२

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

संगमनेर येथील एक होतकरू तरुण अभियंता आपल्या नवपरिणीत पत्नीला घेऊन अजस्र बांधकामक्षेत्राच्या नोकरीत पंचमहाभूतांशी नित्य नवी झुंज घेतो. आपल्या अफाट कर्तृत्वाने मानवी अस्तित्वाशी सगळे एकेक कडीने जोडतो, जणू जीवन फुलवणारे...



आपल्या मेंदूवर अवलंबून असते आपले वर्तन आणि आपल्या वर्तनाने
आपला मेंदूही बदलू शकतो. जसजसा मेंदूविज्ञानाचा आणि त्याला पूरक व पोषक
जैवतंत्रज्ञानाचा विकास होत गेला, तसतसा संशोधनाचा दिशाकोन बदलत गेला.
मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची पाळेमुळे
मेंदूत असली पाहिजेत,
या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी आली.

मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

## आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी
सुबोध जावडेकर



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक दुसरा
१५ फेब्रुवारी २०२४
मूल्य : ₹ २०/-


अनुक्रम :


- संपादकीय / ५
- अभिप्राय / ८
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *नव्याने सामोरी ठाकलेली सीता*
  – डॉ. श्रीराम गीत / ९
  *आरोही : विशेष फूल फुलताना*
  – डॉ. अनुराग लव्हेकर / १५
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / १९
- असे जन्मले पुस्तक!
  *काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस'*
  – डॉ. सुहास भास्कर जोशी / २३
- आठवणींच्या खिडकीतून
  *घर तिघांचं हवं...*
  – माधव वझे / २७
- क... कवितेचा : म. वि. कोल्हटकर / ३१
- उद्‍गार
  *मामाच्या गावाला : डॉ. प्रकाश सपकाळे*
  – प्रा. डॉ. रा. गो. चवरे / ३३
- राजहंसी पार / ३९
- वाचकांच्या मनातलं... / ४१


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या
सीतेच्या विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

### सीता

अभिराम भडकमकर

किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)

बेर्डेमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार -
नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार -
वाद्यवृंदकार कसा घडत गेला,
नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी.
कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

### हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)







समाजात समांतरपणे अनेक व्यवस्था कार्यरत असतात.
क्षेत्र कोणतंही असो, तिथे भ्रष्ट आणि वेळकाढू माणसं
असतातच. एकंदरच माणसाचा जीवनव्यवहार हा
परस्परविरोधी असतो. या व्यवहाराचं एक चित्र म्हणजे...

### संभ्रमाची गोष्ट

पी. विठ्ठल

किंमत : ₹ ३८०/- । (ट. ख. ₹ ५०)



# संपादकीय

*आयुष्य जास्तीत जास्त सुंदर आणि आनंदी करण्यासाठी माझ्या क्षमता ओळखून मी काय करू शकते, हे समजले की ताणाचा थकवा, परिश्रम हा अर्थ जाऊन दुसऱ्या सकारात्मक अर्थासाठी म्हणजे सुंदर आयुष्याच्या ओढीसाठी आपण जोमाने प्रयत्न करू; कारण कुठल्याही ओढीशिवाय म्हणजेच ताणाशिवाय जगणे अशक्य आहे.*

नमस्कार वाचकहो,

साधारणपणे जानेवारी महिना संपत आला की, अनेकांच्या घरी वार्षिक परीक्षेचे वेध लागतात. मग वातावरण एकदम बदलून जाते. आपल्या पंतप्रधानांनीही 'परीक्षा पे चर्चा' हा उपक्रम २०१८मध्ये सुरू केला, तेव्हा २२ हजार विद्यार्थ्यांनी त्यासाठी नोंदणी केली होती. वर्षागणिक प्रतिसाद वाढतच गेला आणि आता ही संख्या २.२५ कोटींवर पोहोचली आहे. यावरून असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना या परीक्षांचा किती ताण असतो. याचा विचार करताना असे वाटले की; खरेच हा ताण केवळ परीक्षेपुरता मर्यादित असतो, की आपल्या आयुष्यातही तो असतो. जरा खोलवर गेल्यावर वाटले, या ताणाने आपले सगळ्यांचे आयुष्यच व्यापले आहे; म्हणूनच याविषयीच तुमच्याशी बोलायचे ठरवले.

'ताण' या शब्दाचे शब्दार्थकोशात दोन अर्थ दिलेले आहेत - एक नेहमीचा, आपल्या परिचयाचा अर्थ म्हणजे फार परिश्रम केल्याने येणारा थकवा, शीण किंवा एखादी गोष्ट करण्यापूर्वीच मनावर घेतलेले दडपण. दुसरा अर्थ 'ओढ' असा आहे. म्हणजे एखाद्या गोष्टीचे मनापासून चिंतन करणे, ती मिळवण्यासाठी किंवा ती अमलात आणण्यासाठी मनापासून प्रयत्न करणे आणि अखेर ती गोष्ट मिळाल्यानंतर होणारा आनंद उपभोगणे.

आता असे पहा, प्रत्येक व्यक्तीला कशाची ना कशाची तरी ओढ असतेच. म्हणजे लहान बाळाला आईच्या प्रेमाची - खेळण्यांची, विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशाची, नोकरी-व्यवसायातील व्यक्तीला चांगले भवितव्य घडवण्याची, गृहिणीला गृहसौख्याची, पती-पत्नीला एकमेकांच्या प्रेमाची-सहजीवनाची, मित्र-मैत्रिणींना चांगल्या मैत्रीची ओढ असते. या ओढीची यादी खरेच खूप मोठी आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर

ती कमी-जास्त होत जाते इतकेच. कुठल्यातरी ओढीशिवाय माणूस कुठलेही काम करायला प्रवृत्त होऊ शकत नाही, म्हणजे ओढ असलीच पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर ताण असलाच पाहिजे; कारण ती एक आनंद देणारी गोष्ट आहे.

पण.. बरेच जण इथेच चुकतात. आपण ताण म्हणजे संकट समजतो. कुठलीही गोष्ट करताना ती समजून घेऊन केली, तर आपल्याला ताण येत नाही. आता समजून घ्यायचे म्हणजे काय, तर आपल्या क्षमता ओळखायच्या आणि त्याप्रमाणे वागायचे. प्रत्येक व्यक्तीची हरएक गोष्ट करण्याची एक क्षमता असते. आपण आपल्या क्षमतेप्रमाणे वागलो, तर आपण ती गोष्ट करण्यात यशस्वी होतो, त्यातून आनंदी होतो आणि त्यामुळे त्या गोष्टीचा आपल्याला ताण येत नाही. थोडक्यात संकट न वाटता त्या गोष्टीची ओढ वाटते.

प्रत्येक वेळी स्वत:ची तुलना दुसऱ्याशी केल्यामुळे आपण ताणाखाली वावरत असतो. तसेच आपल्या कुटुंबातील जवळच्या व्यक्तीची तुलना नकळतपणे का होईना, दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तीशी करणे गैरच असते. त्यातून संपूर्ण कुटुंबच ताणाखाली वावरायला लागते. प्रत्येकात काही चांगले तर काही वाईट असणारच, हे एकदा मान्य केले, की कितीतरी गोष्टी सोप्या होतात. माणसाच्या हातून केव्हातरी, काहीतरी चुका होणारच; पण त्या पुन्हा घडू नयेत, त्यातून शिकून आयुष्यात पुढे जायचे असते, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण अनेकदा भूतकाळातल्या भविष्यकाळात रमत असतो आणि त्या गोष्टीचा ताण घेऊन जगात असतो. म्हणजे जसे, 'मी जर अमुक वेळी असे वागले असते, तर आता असे झाले असते' वगैरे. पण आता वर्तमानात काय चालले आहे, याकडे आपले लक्षच नसते, नव्हे, आपण कायम भूत आणि भविष्य यांचाच विचार करतो आणि खरोखरीच जे Present म्हणजे वर्तमान आहे, ते विसरतो आणि उगाचच घडून गेलेल्या आणि कदाचित घडणाऱ्या गोष्टीचा ताण घेतो.

ताणाच्या दुसऱ्या सकारात्मक अर्थापाशी म्हणजेच आंतरिक ओढीपाशी पोहोचण्यासाठी काय करता येईल? खरे तर आज अनेक मार्ग उपलब्ध आहेत. पण ते सर्व आपल्यासाठी योग्य आहेत का, याचा विचार करावा. योग्य तो पर्याय निवडावा.

आज जीम, योगासने, एरोबिक्स, झुंबा इत्यादी अनेक पर्याय शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी उपलब्ध आहेत. त्यातून शरीर सुदृढ होते, पण ते करताना तुम्ही मनानेही तिथे हजर असले पाहिजे; तरच त्यातून तुम्हाला फायदा होतो, आनंदी आणि ताजेतवाने वाटते. मग दिवसभराची कामे करण्यासाठी तुमच्यात उत्साह येतो. कारण तुम्ही सुदृढ शरीर प्राप्त करण्याच्या ओढीने म्हणजेच सकारात्मक अर्थी ताणाने व्यायाम केलेला असतो.

हे झाले शरीराच्या बाबतीत. मुख्य बाब मनाची. कारण 'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धींचे कारण' असे तुकोबारायांनी सांगूनच ठेवले आहे. यासाठी आपल्या दिनचर्येतील थोडा वेळ स्वत:च्या एखाद्या तरी छंदासाठी काढला पाहिजे. कधी समवयस्कांबरोबर, तर कधी परिचयातील इतर व्यक्तींबरोबर मिसळले पाहिजे. यातून आपापसांत चर्चा होऊन आपल्या प्रश्नाचे उत्तर आपसूकच सापडते आणि आपला ताण हलका होतो. शेवटी माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे, त्याला समाजात मिसळल्याशिवाय पर्याय नाही. या सर्वांच्या जोडीला मन:शांतीसाठी ध्यानधारणा असली तर उत्तमच!

खरे तर माणसाने कायमच विद्यार्थ्याच्या भूमिकेत असावे, म्हणजे सतत नवनवीन शिकावे; त्यामुळे बुद्धी तर कार्यरत राहीलच, शिवाय त्याच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास येईल, कारण सततच्या शिकण्यातून तो प्रत्येक बाबीला जाणून घेण्याचा प्रयत्न करेल, त्याचे चिंतन करेल आणि त्यातून त्याला आनंद मिळेल. परिणामी तो चांगल्या अर्थी ताणात राहील.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीने दुसऱ्याचे मोठेपण मान्य करण्याची वृत्ती बाळगली पाहिजे, तसेच दुसऱ्याला आपणहून मोठेपण बहालही करता यायला हवे, म्हणजे प्रत्येक वेळी 'माझे वागणे योग्य असलेच पाहिजे' असा अनावश्यक ताणही येत नाही आणि कधी कधी आपल्याला चुकायचीही मोकळीक मिळते. सर्वांनीच लक्षात ठेवावी अशी आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्या रोजच्या व्यवहारातील अनेक गोष्टींबद्दल असलेला 'चकार' काढायला शिकले पाहिजे. उदा., हे अमुक वेळेतच झाले पाहिजे, समोरच्या व्यक्तीने तमुक प्रकारेच वागले पाहिजे इ. म्हणजे ताणाचे अनेक प्रसंग आपोआप कमी होतील.

सर्वांत शेवटी असे म्हणता येईल की,

*'सुख-दु:खाचा कोणी न दाता, दुसरा देतो ही कुबुद्धी रेखा ।*
*'मी' करतो हा वृथाभिमान, स्वकर्म-सूत्रे गुंफिले सर्व जण ।।*

या वचनाप्रमाणे आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी मी स्वत: जबाबदार आहे, हे समजून घेतले पाहिजे. लोकांनी माझ्याबरोबर जसे वागावे असे मला वाटते, तसे माझे त्यांच्याशी वागणे असते का; याचा विचार कायम आपल्या मनात असावा. आयुष्य जास्तीत जास्त सुंदर आणि आनंदी करण्यासाठी माझ्या क्षमता ओळखून मी काय करू शकते, हे समजले की ताणाचा थकवा, परिश्रम हा अर्थ जाऊन दुसऱ्या सकारात्मक अर्थासाठी म्हणजे सुंदर आयुष्याच्या ओढीसाठी आपण जोमाने प्रयत्न करू; कारण कुठल्याही ओढीशिवाय म्हणजेच ताणाशिवाय जगणे अशक्य आहे, निदान मलातरी!

तुम्हाला काय वाटते??

**आरती घारे,** कार्यकारी संपादक

# अभिप्राय

नितीन गडकरी
**NITIN GADKARI**

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India

सत्यमेव जयते
आज़ादी का अमृत महोत्सव

Do No. 2205/MP/RT&H /2024
Date :- 20 JAN 2024

**शुभेच्छा**

'राजहंस' या मराठीतील आघाडीच्या प्रकाशन संस्थेचे प्रमुख श्री. दिलीप माजगावकर यांची 'वाणी आणि लेखणी' व 'पत्र आणि मैत्र' ही दोन पुस्तके मिळाली. आभारी आहे. मराठी भाषा, साहित्य आणि विचार या तिन्हींप्रति तत्वनिष्ठ राहून श्री. माजगावकरांनी 'राजहंस'चा पसारा वाढवला. हे करताना त्यांनी कुठेही दर्जा ढासळू दिला नाही. त्यांचा स्पष्टवक्तेपणा आणि श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेणारे वक्तृत्व याचा परिचय करून देण्याचे काम 'वाणी आणि लेखणी' हे पुस्तक करते. विविध प्रसंगांना त्यांनी केलेल्या भाषणांमधून प्रकाशन व्यवसायाविषयीची त्यांची स्पष्ट आणि प्रामाणिक भूमिका विशेषत्वाने भावते. याशिवाय विविध मान्यवरांकडून आलेल्या पत्रांमध्ये पु.ल. देशपांडे यांनी पत्रातून केलेले त्यांचे कौतुक आणि प्रस्तावनेतून सई परांजपे यांनी मांडलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व लक्षवेधी ठरते. 'पत्र आणि मैत्र' या पुस्तकामध्ये स्वतः श्री. माजगावकर यांनी लिहिलेल्या पत्रांचा संग्रह वाचायला मिळतो. दिग्गज साहित्यिक, वाचक, श्रोते, कलावंत, पत्रकार, रंगकर्मी, सामाजिक कार्यकर्ते या साऱ्यांना श्री. माजगावकर यांनी लिहीलेली पत्रे खऱ्या अर्थाने मराठी साहित्यातील एक अनमोल ठेवा आहे, असे मला वाटते. याशिवाय नामवंत लेखकांनी त्यांच्यावर लिहिलेले लेख संपूर्ण व्यक्तिमत्वाचा उलगडा करणारे आहेत. मराठी साहित्याच्या दर्जेदार प्रवासाचे साक्षीदार असलेले श्री. दिलीप माजगावकर यांचा उत्तम परिचय करून देणारी पुस्तके प्रकाशित केल्याबद्दल 'राजहंस' प्रकाशनाचे अभिनंदन.

श्री. दिलीप माजगावकर यांच्या योगदानातून मराठी साहित्य विश्व अधिक समृद्ध व्हावे आणि त्यांना ईश्वराने दीर्घायुरारोग्य प्रदान करावे, अशी मी प्रार्थना करतो.

आपला

(नितीन गडकरी)

**श्री. दिलीप माजगावकर**
राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०
फो. (०२०) २४४७३४५९

Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: (RTH) 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## नव्याने सामोरी ठाकलेली सीता

*सुष्ट व दुष्ट विचारांची सार्वकालिक लढाई कादंबरीत पानोपानी चालूच राहते. मात्र आपण रामायणातील सीता वाचत आहोत याचे वाचकांचे भान चुकूनही सुटणार नाही, याची काळजी कादंबरीकाराने प्रत्येक प्रसंगात घेतली आहे हे विशेष. ज्याची त्याची सीता त्याने त्याच्या नजरेतून अनुभवावी, मनात साठवावी.*

राजहंस प्रकाशनाची 'सीता' कादंबरीची वेगळीच जाहिरात पाहण्यात आली. अभिराम भडकमकर या गाजलेल्या लेखकाची ही नवीन कादंबरी, तीही पौराणिक असून 'ही विचारांची लढाई आहे', अशा अर्थाची जाहिरात पाहून माझी उत्सुकता चाळवली. प्रथम 'देहभान' नाटक, नंतर 'ॲट एनी कॉस्ट', 'असा बालगंधर्व...', 'इन्शाअल्लाह' आणि आता 'सीता' या साऱ्या विषयांचा ताळमेळ लागणेही कठीण असणाऱ्या मांडणीतून मी वाचनासाठी सीतेकडे वळलो, तेही रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेच्या धामधुमीच्या काळात. प्रकाशनाची वेळ अचूक गाठण्यात अशा बाबतीत राजहंसचा हात अन्य कोणी पकडू शकत नाही. लहानपणी रामायण ऐकणे, रामकथा वाचणे, नंतर रामायणाचे दूरदर्शनवरचे सर्व भाग पाहणे, हे सर्व केले आहे. रामायणातील विविध व्यक्तिरेखांबद्दल जाणकार विचारवंत विश्लेषकांनी केलेल्या टिप्पणीसकट कळत्या आणि जाणत्या वयात वाचून झाल्यानंतर आता 'सीता कादंबरी' वाचण्यास सुरुवात केली.

एखाद्या कादंबरीच्या लेखनामध्ये लेखक कोणता फॉर्म घेतो, याचा अंदाज सहसा काही पहिल्या पानांतच येतो. पण येथे सुरुवात होते ती वाल्मिकी ऋषींच्या कथनातून. हा सारा आत्मचिंतनाचा, आत्मप्रवासाचा गहन भाग. मात्र ज्या वेळी भूमिकन्येची कथा सुरू होते; तेव्हा मात्र अत्यंत सोप्या, रसाळ भाषेमध्ये, वाचक रामकथेमध्ये गुंतून जातो. कादंबरी सीतेवरची असली; तरीसुद्धा रामाचा, रामाच्या घराण्याचा, त्या काळाचा संदर्भ विविध अंगांनी समर्थपणे उभा करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

सीतेची जन्मकथा अनेकदा ऐकली असली तरी इथे ज्या पद्धतीत तिचे वर्णन आले आहे, ते वाचताना अक्षरशः शहारा येतो. लंकेत सीतेने अग्निपरीक्षा पार पाडली याच्या विविध वर्णनपर कथा ऐकल्या आहेत. इथे लंकेमधील सीतेने पार पाडलेली

# राजहंस बुक क्लब

## आता लवकरच नव्या स्वरूपात

प्रिय वाचक,

गेली अनेक वर्षे राजहंस बुक क्लबच्या विविध सवलत योजनांचा लाभ आपण घेत आला आहात. बदलत्या काळानुसार यातही काही बदल होणे गरजेचे वाटत होते. काही वाचकांनी तसे मत व्यक्तही केले होते. याचा योग्य विचार करून खालील निर्णय घेतला आहे :

१. सध्याच्या बुक क्लबची मुदत ३१ मार्च २०२४ अखेर संपुष्टात येईल.
२. एप्रिल २०२४पासून नव्या रूपात नवीन योजना घेऊन आम्ही आपल्या भेटीला येऊ. त्यांचा तपशील लवकरच जाहीर करण्यात येईल.
३. आपल्यापैकी कुणालाही नव्या स्वरूपाबद्दल काही सूचना करायच्या असतील, तर स्वागत आहे. संपादन विभाग, राजहंस प्रकाशन यांना त्या पत्र किंवा ई-मेलद्वारे अवश्य पाठवाव्यात ही विनंती.

ई-मेल : rajhansprakashandigital@gmail.com

निवड तुमची...

# राजहंस ग्रंथवेध

## आता ई-कॉपी स्वरूपातही उपलब्ध...

‘राजहंस ग्रंथवेध’ १ मार्च २०२४पासून छापील प्रतीबरोबरच ई-कॉपी स्वरूपातही उपलब्ध होणार आहे. तुम्हाला तो दरमहा प्रकाशनानंतर लगेचच ई-मेलवर पाठवला जाईल.

बदलत्या काळानुसार ज्या वाचकांना ‘ग्रंथवेध’ स्क्रीनवर वाचायला आवडेल; त्यांनी कृपया व्यवस्थापक, ग्रंथवेध मासिक, राजहंस प्रकाशन, पुणे यांना खालील ई-मेलवर दिनांक २९ फेब्रुवारी २०२४अखेर आपली संमती कळवावी, म्हणजे मार्च २०२४च्या अंकापासून त्यांना ग्रंथवेध ई-प्रतीच्या स्वरूपात पाठविला जाईल...!

कृपया ई-मेलमध्ये आपले नाव व पत्ताही अवश्य नमूद करावा, ही विनंती.

ई-मेल : rajhansprakashandigital@gmail.com


अग्निपरीक्षा वेगळ्याच अंगाने समोर येते. राम तिला 'विदेहनंदिनी' नावाने साद घालतो व ती सुखरूप या दिव्यातून डाग न लागता बाहेर पडते. लक्ष्मणरेषेचे वर्णन आपण सतत करत असतो. मात्र या साऱ्यामधील वाल्मिकी रामायणामधील संदर्भांचे वास्तव घेऊन त्याला ललित शब्दरूप लेखकाने दिले आहे. आपापसातील नातेसंबंधाचे चित्रण नेमक्या व मोजक्या शब्दांतून पुढे येत जाते. सीता व ऊर्मिला या बहिणी राम व लक्ष्मण यांच्या अर्धांगिनी बनतात, आणि रामाचा वनवासाचा निर्णय घेण्याचा प्रसंग येतो ते सारे नाट्य एखाद्या चलचित्राप्रमाणे संवादरूपाने आपल्यासमोरून जाते. कुठे रेंगाळावे, कुठे ठेहराव द्यावा, कुठे वर्णनाला वेग द्यावा यावरची अभिरामांची पकड विलक्षण आहे. त्यामुळे माहीत असलेली कथा वाचतानासुद्धा वाचकाची उत्सुकता सतत ताणलेली राहते.

आणि अयोध्येमध्ये वाल्मिकी ऋषी एखाद्या सूत्रधाराप्रमाणे समोर येतात, वाचकाला विचारप्रवृत्त करून पुन्हा नाहीसे होतात. वाल्या खरेच होऊन गेला का? वाल्याचा वाल्मिकी ऋषी होणे शक्य आहे का? वाल्मिकींनी रामायण लिहिले का ते खरेच घडले? ही मिथक कथा आहे का इतिहास? देव, दानव, राक्षस, मानव, वानर यांवर आधारित काल्पनिक कथित, मिथक म्हणजे रामायण असा आग्रह धरणारेसुद्धा ही कादंबरी वाचून झाल्यावर राम होऊन गेला; अशा निष्कर्षापर्यंत येऊ शकतील.

सार्वकालिक नीतिनियम व स्वार्थातून होणारी घसरण आणि सामाजिक घुसळण याची चर्चा कादंबरीच्या मध्यावर सुरू होते, तेव्हा ही रामकथा न राहता तुमची आमची वास्तविकता दाखवणारी समकालीन कथा बनते. वैयक्तिक रागलोभ, एकमेकांवर केल्या जाणाऱ्या आरोपांचे, सूडाचे आजही सहज सापडणारे निमित्त यासाठी छद्ममूर्ती व विकटकीर्ती या दोन विचारवंतांची केलेली योजना व त्यांनी केलेले उपद्व्याप हे

अभिनंदन!

गिरणा गौरव प्रतिष्ठान,
नाशिक




स्मिता पाटील स्मृती
शब्दपेरा पुरस्कार

आतून उगवलेल्या कविता

◆

प्रा. प्र. द. कुलकर्णी



खरे तर मुळातूनच वाचायला हवेत. सीताहरणाचा कट रचून त्यासाठी रावणाला उद्युक्त करणे, अशोकवनात सीतेला कैद करून ठेवलेले असताना या विचारवंतांनी लंकेमध्ये आणि लंकाधिपतीच्या मनामध्ये विविध वावटळी कशा उठवल्या आणि राजा जनकाच्या तालमीत शिक्षण झालेल्या सीतेने त्या साऱ्याला तितक्याच कूटनीतीने पण धीरोदात्तपणे तोंड दिले, तो सारा भाग केवळ रंजनाचा न राहता वाचकाचे प्रबोधन करणाराही ठरतो. अशा सुष्ट व दुष्ट विचारांची सार्वकालिक लढाई ही पानोपानी चालूच राहते. मात्र आपण रामायणातील सीता वाचत आहोत याचे वाचकांचे भान चुकूनही सुटणार नाही, याची काळजी कादंबरीकाराने प्रत्येक प्रसंगात घेतली आहे हे विशेष.

एखाद्या ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिरेखेचे उदात्तीकरण करणाऱ्या मोठमोठ्या कादंबऱ्या आजवर बऱ्याच आल्या, गाजल्या. पण ती कादंबरी वाचून झाल्यावर आपण कादंबरीच वाचली आहे आणि त्या लेखकाचे ते तसे मत आहे, असे जाणकार


संगीत नाटक हा त्याच्या जीवनाचा ध्यास झाला,
आणि त्याचं जीवन म्हणजे शोकांत संगीत नाटक झालं!
हे सारं कसं घडत गेलं, ती सांगणारी चरित्र कादंबरी.




असा बालगंधर्व...

अभिराम भडकमकर

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ४५०/- । (ट. ख. ₹ ५०)




दारिद्र्यात पिचत असलेली मुस्लीम वस्ती.
पैशाचा अभाव. शिक्षणाचा अभाव. एके दिवशी वस्ती
ढवळून निघाली. पोरांची धरपकड झाली. त्या शहरातले
हिंदू-मुस्लीम नेते, कार्यकर्ते, राजकारणी या सर्वांना
चित्रित करत पुढे पुढे जाणारी कादंबरी.

इन्शाअल्लाह

अभिराम भडकमकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट. ख. ₹ ५०)

वाचकाच्या मनात ठसलेले असते. उदाहरणच द्यायचे झाले; तर महाभारतावर इरावती कर्वे, अरुणा ढेरे, दाजी पणशीकर, अनंतराव आठवले, दुर्गाबाई भागवत, शिवाजी सावंत या साऱ्यांचे लेखन वाचल्यानंतर मूळ महाभारत वाचताना वाचक गोंधळून जातो. इथे असे असे घडले, एवढेच मूळ प्रतीत सापडते. हा गोंधळ टाळण्यात अभिराम यशस्वी झाले आहेत. हे या कादंबरीचे मला सगळ्यात मोठे वैशिष्ट्य वाटते.

'उत्तरकांड' आणि 'उपसंहार' ही दोन प्रकरणे कादंबरीचा सुवर्ण कळस म्हणायला हरकत नाही. वाल्मिकी रामायण संपते आणि येथे रामायणातील प्रक्षेप व अभिरामांची संयत पण कल्पक लेखणी यातून एक अद्‌भुतरम्य असा मोठा कालपट उलगडत जातो तोही मोजक्या पानांत. नायिका सीता येथे जास्त उजळते व लखलखते. 'सीताशक्ती' म्हणजे काय हे इथे जाणवते.

एखादी कलाकृती अजरामर का होते, तर जेव्हा तिचा कालातीत संदर्भ कोणत्याही वाचकाला जाऊन भिडतो तेव्हा. असेच काही संदर्भविचार लेखनामध्ये अधेमधे विविध पात्रांसमोरच्या प्रश्नातून गुंफून समोर येतात. 'अराजक म्हणजे सुशासन. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार. उपोषणाच्या धमकीने हवे ते मिळवणे म्हणजे हिंसा. राम राज्य विरुद्ध रावण राज्य हा दोन शासन पद्धतींतील विरोधाभास. नियतीच्या हातातील आपण सारे बाहुले आहोत, का सत्कर्म करून यावर मात करता येते?', अशा गहन प्रश्नावर साध्या शब्दांत विविध पात्रांच्या तोंडून उमटणाऱ्या संवादाचा अर्थ कसा लावायचा, ते वाचकांवर सोडून दिले आहे. कादंबरीकार तिथे कोणाचीही बाजू घेत नाही हे विशेष. ज्याची त्याची सीता त्याने त्याच्या नजरेतून अनुभवावी, मनात साठवावी.

मराठी मानसावर गेले ५० वर्षे 'घाशीराम', 'नटसम्राट', 'ययाती', 'रणांगण'


अभिनंदन!

अखिल भारतीय मराठी
साहित्य मंडळ, ठाणे




राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले
साहित्यभूषण पुरस्कार २०२३

रक्तफुलांचे ताटवे

नोमेश नारायण



## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)


अलीकडे अनेक तरुण-तरुणी अमेरिकेत स्थायिक झालीत. निरनिराळ्या कारणांनी तिथे गेलेले त्यांचे पालक अगदी वेगळ्या जीवनशैलीला सामोरे जातात. सहयोग, सहवास, सहजीवनाने त्यांचा आनंद द्विगुणित होतो. सुखदु:खाच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या प्रेमी युगुलांची कहाणी सांगणारी ही अनोखी कादंबरी.

### संधिप्रकाश

ज्योत्स्ना विद्याधर लेले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)





भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरणातून निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता घायाळ झालेला समकाळ म्हणजे 'खांदे सुजलेले दिवस' हा कवितासंग्रह.

### खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

यांचे जसे गारुड कायम आहे, त्यांचे विविधांगी अर्थ लावण्याचे प्रयत्न अजूनही होत राहतात तेच भाग्य अभिरामांच्या सीतेला मिळेल. एका प्रकारे अभिजात लेखकांत अभिराम यांची गणना या पुस्तकामुळे होईल.

संजय शेलार यांनी रेखाटलेली चित्रे आणि मुखपृष्ठ सीतेला मानवी चेहरा देतात. रवी वर्मा यांच्या चित्राप्रमाणे तिला देवी बनवत नाहीत. पुस्तकाचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांनी कादंबरीचा आस्वाद कसा घ्यावा हे वाचकाची उत्सुकता कशी वाढेल या शब्दात लिहिले आहे, तेही कौतुकास्पदच.

***डॉ. श्रीराम गीत***

## आरोही - विशेष फूल फुलताना

‘आरोही - विशेष फूल फुलताना’ या पुस्तकात सौ. राजेश्वरी किशोर यांनी त्यांच्या ‘आरोही’ या आपल्या विशेष मुलीचे संगोपन करताना आलेले विपुल अनुभव शब्दबद्ध केलेले आहेत. पण हे या पुस्तकाचे केवळ वरवरचे वर्णन ठरेल. आपण जितके पर्सनल बोलत, लिहीत जाऊ; तितके ते युनिव्हर्सल होत जाते असे म्हणतात. या कसोटीवर हे पुस्तक शंभर टक्के खरे उतरते. कोणत्याही पूर्वतयारीशिवाय आकस्मिकपणे एका विदारक सत्याला सामोरे जावे लागणे, त्याचा धीरोदात्तपणाने स्वीकार करणे या गोष्टी लेखिकेने ज्या पद्धतीने केलेल्या आहेत; त्याला तोड नाही.

येऊ घातलेले मूल हे विकलांग आहे, विशेष आहे हे सुचविण्याच्या निसर्गाच्या काही पद्धती असतात. त्यांना वैद्यकीय परिभाषेत Missed Abortion म्हणतात. यात बऱ्याचदा गर्भाशयाची वाढ आणि बाळाच्या हालचाली आदी गोष्टी चालू राहतात, पण प्रत्यक्ष गर्भाची म्हणजे आतील बाळाची वाढ, त्याचा विकास व्यवस्थित झालेला नसतो. त्याची लक्षणे कधी दिसतात, कधी दिसून येत नाहीत. सोनोग्राफी व नियमित तपासण्यांनी या गोष्टी टाळता येतात आणि गरज पडल्यास गर्भपिशवी साफ करण्यारखे (D & C) उपचार करता येतात. आरोहीबाबत इथे कुठेतरी पालक म्हणून आपण कमी पडलो का, अनुभव नसल्याने ही त्रुटी राहिली का, पहिल्या गर्भारपणात आणि बाळंतपणात चांगली वैद्यकीय सेवा पुरवण्यात आपण कमी पडलो का; हे दुखरे प्रश्न लेखिकेला कायम सतावताहेत. ते अगदी साहजिक आहे, समजून घेता येण्यासारखे आहे. या गोष्टींचा कसलाही अपराधी गंड नंतर त्यांनी बाळगलेला नाही. सासूसासरे, उपचार करणारे डॉक्टर, स्वत:चा अतिसोशिक स्वभाव यावर दोषारोप करत बसणे तर दूरच, उलट या सगळ्यांना त्यांनी हे पुस्तक सविनय अर्पण केलेले आहे.

आपल्याला एक दीर्घकालीन, अनेक पातळ्यांवर लढावे लागणारे युद्ध लढायचे आहे, याची जाणीव लेखिकेला आहे. ते शांत डोक्याने, संयमाने लढले; तर जास्त चांगले ही जाण अनुभवाने विकसित झालेली असणे अपेक्षित आहे, पण यात लेखिकेच्या मूळ प्रकृतीचाही मोठा हातभार असावा असे वाटते.

आरोहीच्या संगोपनात घ्यावे लागलेले अपरिमित कष्ट, तिला बालपणी न्हाऊमाखू, खाऊ घालताना स्वत:चे विकसित केलेले तंत्र, औषधोपचारांकरता आलेल्या आर्थिक अडचणी, त्यातून निघत गेलेल्या वाटा, तिच्या स्वीकारासाठी अगदी कौटुंबिक स्तरावरून सामाजिक स्तरापर्यंत प्रत्येक पातळीवर होणारी कुचंबणा, त्यातून मार्ग काढण्यासाठी घेतलेला पुढाकार, आखलेले उपाय हे सारे मूळातून वाचण्यासारखे आहे. आरोहीवर झालेल्या जेनेटिक टेस्ट, ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, रेकी आणि अतिरेकी उपचार वाचले की, पृथ्वीतलावर अजून काही उपचारपद्धती शिल्लक उरली आहे का असा प्रश्न पडतो. असाहाय्यतेचा गैरफायदा घेऊन पर्स चोरीला जाण्याच्या प्रसंगातून, थोडा वेळ बाळ सांभाळणाऱ्या शेजाऱ्यांनी मोबदल्यात पैशाची अपेक्षा ठेवल्याच्या प्रसंगातून मानवी स्वभावाच्या क्षुद्र बाजूचे दर्शन होते. अनेक वेगवेगळ्या वेळी अनेक वेळा मदतीला धावून येणाऱ्या ओळखी-अनोळखी लोकांप्रती लेखिका कृतज्ञ आहेत. नोकरीनिमित्त भारतभर सतत होणारी स्थलांतरे, भाषेच्या अडचणी, आरोहीच्या शिक्षणातील अडथळ्यांची शर्यत (महाराष्ट्रापेक्षा बाहेर सुकर - शिक्षण, उपचार सगळेच) यांचा हिकमतीने केलेला सामना, आरोहीची शिकवणी, तिची प्रगती, विशेषत्व निदानात झालेली फरपट, ओढाताण ही सारी धडपड तटस्थपणे लेखिकेने मांडली आहे. त्या म्हणतात - 'आपले मूल विशेष आहे, दिव्यांग आहे. त्याच्या मेंदूची, शरीराची पूर्ण वाढ झालेली नाही ही वस्तुस्थिती पालकांनी मान्य केली, की ते त्या मुलांकडून अपेक्षा ठेवणं बंद करतात. हे चुकीचं आहे. ते त्या मुलाला काहीच कळत नाही, असं गृहीत धरतात. असं न करता त्याची प्रत्येक वेळची हालचाल टिपता आली पाहिजे. मात्र बरेच पालक वस्तुस्थिती नाकारतात, स्वत: निराश होतात आणि मग मुलाच्या प्रगतीचा मार्ग ओळखायला उशीर होतो.'

इतर मुले, माणसे विशेष मुलांशी वेगळी वागतात, त्या वेळी न रागावता त्यांची मानसिकता समजून घेऊन विशेष मुलांच्या सामाजिक समरसतेसाठी पालकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, हे सांगताना लेखिका म्हणतात - 'आपल्या मुलांचं वैगुण्य आधी सांगण्यापेक्षा त्यांचं वेगळेपण आणि विशेषत्व सांगता आलं पाहिजे. कोणासमोर रडत न बसता मी कशी या परिस्थितीला सामोरी जातेय, हे दाखवता आलं पाहिजे. अनोळखी मुलं, मोठी माणसं आरोहीकडे बघत राहतात, हसतात; त्या वेळी शक्य असेल, तर मी त्यांच्याशी बोलते. आरोहीतले सद्गुण दाखवून देते.'

आलाप या आपल्या दुसऱ्या समंजस अपत्याबाबत, त्याच्या प्रगतीबाबत आणि

आरोहीच्या विशेषत्वाचे सावट त्याच्या आयुष्यावर पडू नये यासाठी केलेले डोळस प्रयत्न, त्याच्या येण्यामुळे कुटुंबाला आलेले पूर्णत्व, आलापच्या जन्मानंतर आरोहीच्या वाटचालीने घेतलेला वेग, आलाप-आरोहीचे प्रेमळ भावबंध या गोष्टी लेखिकेला खडतर वाटचालीत नक्कीच वाऱ्याच्या सुखद झुळुकेसारख्या वाटल्या असणार.

या साऱ्या प्रवासात पती श्री. किशोर पाटील सतत सावलीसारखे लेखिकेसोबत आहेत. ते फारसे कुठे व्यक्त झालेले दिसत नाहीत, पण त्यांची उपस्थिती सतत जाणवत राहते. आलापच्या जन्मानंतर अडीच महिन्यांनी त्यांनी त्याला पाहिले. पहिल्या बाळंतपणानंतरच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हा प्रसंग मोजक्या शब्दांत पण अत्यंत हृद्य असा आलेला आहे. विशेषत्व ही गोष्ट कलंक (stigma) नाही. कोणत्याही घरात तिचा शिरकाव होऊ शकतो. त्यात दैवी प्रकोप, न फेडलेले नवस वगैरे असत नाही. पालकांनी या गोष्टीला कमकुवत मनाने सामोरे न जाता खंबीरपणे तोंड दिले पाहिजे. यात अपत्यावरील प्रेम हा भाग अर्थातच आहे, पण केवळ तेवढे पुरेसे नसते. कितीही कष्ट उपसण्याची तयारीही हवी. समाजानेही या मुलांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहायला हवे. तसा दृष्टिकोन तयार होण्यासाठी आणखी जागरूकता होणे गरजेचे आहे. अन्यथा अनेक मार्गांनी मूल व पालकांचे शोषण होणे संभवते. याचा सर्वंकष आढावा 'आरोही' या पुस्तकात घेतलेला आहे, म्हणून हे पुस्तक केवळ एक विशेष मूल आणि तिची आई यांची वैयक्तिक कहाणी न राहता अशी सगळी मुले, त्यांच्या अडचणी यांची प्रातिनिधिक कहाणी ठरते - आपण सगळ्यांनी आवर्जून वाचावी अशी.

***डॉ. अनुराग लव्हेकर***

अभिनंदन!


महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड संचालित
साहित्यसम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय




साहित्य साधना
पुरस्कार २०२४

'सर्कल'ची वर्तुळे

सुलक्षणा महाजन



## ‘राजहंसी’ विविधा



अनेक कृष्णधवल चित्रांसह बहुरंगी चित्रे,
दलालांवर लिहिलेले मान्यवरांचे लेख, दलालांनी
व त्यांच्या समकालीन चित्रकारांनी कालक्रमानुसार
काढलेली चित्रे. हे सर्व समाविष्ट असलेले...

### चित्रकार दीनानाथ दलाल :
चित्र आणि चरित्र

सुहास बहुळकर


किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ ६०)


त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून
चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले... सोयाबीनपासून
मोटारींसाठी सुटे भाग घडवले... असा हा मुलखावेगळा
कार्व्हर या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

### किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)




जीवनाच्या कॅनव्हासवर लक्ष्मण यांनी रेखाटलेली
शब्दचित्रं, टिपलेल्या घटना!
उपहास, विडंबनाचा सूर पकडत जाणारी
आणि सदोदित तजेल्याचं वरदान लाभलेली...

### लक्ष्मणरेषा

आर. के. लक्ष्मण

अनुवाद : अशोक जैन

आवृत्ती बारावी । किंमत : ₹ २२५/- । (ट.ख. ₹ ५०)



# चित्र पाहीन आवडी

## भांडई... भांडीवाला...

आपल्याला बाजारात फिरताना विविध भांडी रोजच दिसत असतात. छोट्या गावात आणि शहरात 'भांडई... भांडीवाला...' अशा आरोळ्या आपण ऐकत असतो. चित्रातून काही भांडी परिचित असतात आणि शालेय चित्रकलाजगतात 'स्टिल लाइफ' विषय समाविष्ट असल्याने आपण विविध घाटांची-आकारांची भांडी असलेली चित्रे बालवयापासून पाहत असतो.

अगदी प्राचीन काळापासून भांडी चित्रात रंगवलेली दिसतात. रोमन साम्राज्यात भिंतीवरील चित्रात विविध भांडी दिसतात. प्रामुख्याने 'आंफोरा' हे मद्य साठवण्याचे भांडे पॉमपाई येथील चित्रात दिसून येते. स्वयंपाकाची भांडी असलेली अशी चित्रे मध्ययुगातील अनेक चित्रकारांच्या चित्रात दिसतात. 'किचन स्टिल लाइफ' नावाचे व्हेलाक्वेझ ह्या चित्रकाराचे १७८०चे सुमारास केलेले चित्र ह्या संदर्भात पाहण्यासारखे आहे. ह्या चित्रामध्ये एका बाजूला शेगडी असून त्यात राख आणि कोळसे दाखवले असून शेगडीवर एक भांडे दिसते आहे. बाजूला लाकडी टेबलावर किटली असून त्याचे चित्रण वास्तववादी स्वरूपाचे आहे. दुधाची धातूची किटली आणि त्यावरील प्रकाशाचे चित्रण आणि हायलाइट विशेष लक्षवेधी आहेत. अशी भांड्यांची चित्रे विविध काळांत अनेकदा दिसतात. वास्तववादी, घनवादी अशा अनेक कलाप्रकारांत भांड्यांचे चित्रण दिसते.

आता आपण 'भांड्यांची चित्रे करणे' आणि 'भांडीच चित्र म्हणून मांडणे' ह्यांतील फरक लक्षात घेऊ. उत्तर आधुनिक काळात कलेत 'मांडणी शिल्परचना' हा कलाप्रकार आला आहे, तो उदाहरणासहित पाहू. सुबोध गुप्ताच्या कलाकृतींद्वारे.

सुबोध गुप्ता ह्या चित्रकाराने भारतात स्टीलची 'तयार भांडी' कलाकृती म्हणून मांडायला सुरुवात केली. त्यातील प्रमुख मुद्दा म्हणजे तयार-वस्तू कलावस्तू म्हणून मांडण्याचा मुद्दा. सर्वप्रथम अशी तयार वस्तू 'दुशा' ह्या चित्रकाराने कलाकृती म्हणून मांडली, ती 'दादावाद' नावाने ओळखल्या जाणाऱ्या कलाचळवळीत.

दुशा याने 'युरीनल पॉट' ही तयार वस्तू वापरली, तर सुबोध गुप्ता तयार वस्तू म्हणून 'भांडी' घेतो आणि त्याला रूपकात्मक अर्थ प्राप्त होईल अशा वेगळ्या रूपात मांडतो.

वेगळ्या वस्तू एकत्र आल्या की त्याचा संदर्भ बदलतो आणि अन्वयार्थदेखील



बदलतो. त्याच्या एका मांडणीशिल्पात बजाज कंपनीची चेतक स्कूटर घेऊन त्याला मागे किटल्या लावल्या, की ती दूधवाल्याची होते. आता याला कलाकृती म्हणायचे का, वगैरे प्रश्न पडतील. सुबोधने अशा प्रकारे सायकल आणि किटल्या मांडल्या, आणि त्यापेक्षा पुढे जाऊन स्कूटर वापरणारे बदलते ग्राम्यजीवन दाखवले आहे. ह्याला 'मांडणीशिल्प' म्हणतात. आपण याआधी पाहिलेले आहे. 'धिस साइड अँड अदर साइड' ह्या नावाने ही स्कूटर आणि किटलीचे शिल्प मांडले आहे. सुबोधची शिल्पे एका अर्थाने सार्वत्रिक असली, तरी भारतीय ग्रामीण जीवन दाखवणारी असतात. आता त्याने भांडी हे आपले माध्यम मानले आहे. त्यावर टीका झाली खरे, परंतु फारसे न जुमानता त्याने आपले कलाप्रयोग सुरूच ठेवले.

ह्यात पुढे साकारलेली शिल्पे २० फूट, ३० फूट अशी भव्य असून भांडी वापरून साकारलेली आहेत. विविध कल्पना वापरून साकार केली आहेत. जसे की बादलीतून पडणारे पाणी, भांडीरूपात दिसते; म्हणजे बादलीतून पाणी पडणारी आकृती आणि आत भांडी रचलेली असा कलाप्रपंच. इतरही उदाहरणे पाहू, जसे की कवटीच्या आकारात रचलेली भांडी, किंवा वटवृक्षरूपात दिसणारी भांडी. हा कलाप्रपंच पाहिला की त्याला मराठीत 'भांडीवाला' म्हटले तर वावगे ठरू नये.

'फिरणारे पुडाचे डबे' ही सुबोधची आणखी एक महत्त्वपूर्ण कलाकृती. ह्या शिल्पात पुडाचे डबे फिरतात आणि डबा येथे भुकेचे प्रतिनिधित्व करतो. एक प्रतीकात्मक रूपात 'भांडी' ही वस्तू म्हणून वापरताना स्टील धातूची चमक आणि एकीकडे रिकाम्या थाळीत समावलेली भूक, असा दुहेरी अनुभव मांडण्यासाठी सुबोध






प्रयत्नशील असतात. ९०% भारतीय लोक स्टीलच्या भांड्यांचाच वापर करतात, असे ते म्हणतात. मध्यमवर्ग, गरिबी ह्यांचे ही भांडी प्रतिनिधित्व करतात. आणि म्हणून तो त्याला कलाकृतीत स्थान देतो.

सुबोध जी मांडणी करतात; त्यात भिंतींचे रंग, प्रकाशयोजना आणि आजूबाजूच्या कलाकृतीत समावेश करून घेणे महत्त्वाचे ठरते. सुबोधचा कलाप्रवास हा अनेक चढ-उतार यांनी भरलेला आहे. सामान्यत: जसे चित्रकाराच्या स्टुडिओत रंग दिसतात, तसे सुबोधच्या स्टुडिओत भांड्यांचे अनेक प्रकार दिसत असतात, एक माध्यम म्हणून त्याकडे पाहिले जाते. हा कलेतील बदल आपण जाणून घेतला, तर हा नवा कलाप्रकार आपण आनंदाने पाहू-अनुभवू शकतो.

सुरुवातीला १९९५च्या सुमारास जेवणासाठी वापरण्यात येणारे लाकडी पाट वापरून त्याने '२९ मॉर्निंग' नावाने कलाकृती मांडली. पुढे १९९७ साली त्याने मुंबई येथे 'कमळ' आणि 'भांडी' एकत्र मांडून मांडणीशिल्प केले. एका चित्राला त्याने 'बिहारी' नाव दिले आणि चित्राखाली 'बिहारी' असे लिहून त्याला लहान लहान दिव्यांनी सजवले. दिवे चालू-बंद होतात आणि त्याने ते चमकून दिसतात. त्याला बिहारी असण्याच्या संबोधनाबाबत करावयाचे हे भाष्य आहे. दिल्ली येथे राहत असताना आलेले अनुभव ही कलाकृती दाखवते.

कलाकार कायम भुकेलेला असतो आणि ती गरज असते, असे सुबोध मानतो.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




श्री. पु. भागवतांच्या नेतृत्वाखाली 'मौज' साप्ताहिक,
'सत्यकथा' मासिक आणि 'मौज प्रकाशनगृह'
यांनी वाङ्मय आणि कला या क्षेत्रांत केलेल्या कार्याचे
व श्री.पुं.नी या तिन्ही विभागांत केलेल्या
संपादनाचे स्वरूप वस्तुनिष्ठ भूमिकेतून
तपासण्याचा प्रांजळ प्रयत्न.

### वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत

संपादक : सुधीर रसाळ, वसंत पाटणकर

किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ ६०)


कसे घडतात आर्थिक घोटाळे? कसे सापडतात त्यांचे सूत्रधार?
आर्थिक गुन्ह्यांचं गुंतागुंतीचं विश्व
सोप्या भाषेत उलगडून दाखवलंय, शोधक वृत्तीच्या
नि भेदक नजरेच्या एका तरुण फोरेन्सिक ऑडिटरनं...

### आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग

अपूर्वा प्रदीप जोशी

किंमत : ₹ ३००/- । (ट. ख. ₹ ५०)




एका विशेष मुलीच्या आईचं हे अनुभवकथन
कुटुंबाचं विशेष मुलावरचं प्रेम वाढवण्यासाठी,
त्याच्या आयुष्यातील नैराश्य कमी करण्यासाठी,
त्याला समजून घेण्यासाठी नक्कीच वाचावं असं...

### आरोही : विशेष फूल फुलताना

राजेश्वरी किशोर

किंमत : ₹ ३६०/- । (ट. ख. ₹ ५०)




# असे जन्मले पुस्तक!

## काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस'

माझी यापूर्वी सहा पुस्तकं प्रकाशित झाली असली, तरी 'काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस': न संपणारं गारूड' हे राजहंस प्रकाशननं प्रकाशित केलेलं पहिलंच पुस्तक. काफ्काच्या 'मेटॅमॉर्फोसिस'कडे ३६० अंशातून पाहण्याच्या आगळ्यावेगळ्या दृष्टिकोनामुळे हे पुस्तक माझ्यासाठी तर महत्त्वाचं बनलं आहेच, पण राजहंससाठी पण ही एक अभिमानास्पद साहित्यकृती ठरेल अशी आशा आहे.

'एके दिवशी सकाळी अस्वस्थ करणाऱ्या स्वप्नातून ग्रेगॉर सॅम्सा जागा होतो, तेव्हा त्याचं रूपांतर एका प्रचंड आकाराच्या किळसवाण्या किड्यात झालेलं असतं' - हे फ्रांझ काफ्काच्या 'मेटॅमॉर्फोसिस' या जगप्रसिद्ध लघुकादंबरीतील पहिलं वाक्य. विद्यार्थिदशेत असताना आमच्या गरवारे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य आणि सुप्रसिद्ध कथाकार कै. श. वा. चिरमुले यांच्या तोंडून पहिल्यांदा मी हे ऐकलं, तेव्हा मी अक्षरश: थरारून गेलो होतो. केवढी विलक्षण आणि भयानक घटना. म्हणजे आपल्या ध्यानीमनी नसताना आपलं रूपांतर एखाद्या घाणेरड्या किड्यात... बापरे! बेसावध असताना कोणीतरी पोटात जोरात गुद्दा मारावा, तसं वाटलं होतं. तातडीनं हे पुस्तक वाचायचंच, असं मी ठरवून टाकलं. पण त्या वेळी हे पुस्तक मला उपलब्ध झालं नाही. आणि मग कालांतरानं ते माझ्या विस्मरणात गेलं.




किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

पुढे मी एमकॉमच्या परीक्षेत 'बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन' या विषयात (त्या वेळच्या) पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला. कॉलेजातही पहिला आलो होतोच. नंतर मी एमफिल, एमबीए, एलएलबी, पीएचडी अशा कॉमर्स व मॅनेजमेंटमधील पदव्या प्रथम वर्गात मिळवल्या. पण मराठी आणि जागतिक साहित्य हे कायमच माझ्या अभ्यासाचे आणि प्रेमाचे विषय राहिले. किंबहुना वाचन आणि लेखन हे नेहमीच माझे श्वास आणि उच्छ्वास राहिले होते

आणि आहेत. संधी मिळताच कार्पोरेट क्षेत्रातील नोकरीकडे पाठ फिरवून, आनंदाने मी माझ्या गरवारे कॉमर्स कॉलेजमध्ये कॉमर्स आणि मॅनेजमेंट या विषयांचं अध्यापन करायला लागलो. आता (कै.) चिरमुलेसरांबरोबर स्टाफरूममध्ये मराठी आणि इंग्रजी भाषेतील अनेक साहित्यिकांविषयी अभ्यासपूर्ण चर्चा सुरू झाल्या. सरांनी उद्युक्त केल्यामुळे मी इंग्रजी भाषेतील हेमिंग्वे, सॉमरसेट मॉम, ऑस्कर वाइल्ड, जॉर्ज ऑर्वेल, आयन रँड, विल्यम गोल्डिंग, आल्बेर काम्यु, सार्त्र, आयनेस्को, हारुकी मुराकामी, अरुंधती रॉय, शशी देशपांडे अशा अनेक थोर लेखकांच्या गाजलेल्या साहित्यकृती वाचून काढल्या. पण काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस' वाचायचं राहूनच गेलं होतं.

बरेच दिवस विस्मरणात गेलेलं हे पुस्तक एके दिवशी अचानक दत्त म्हणून समोर उभं राहिलं. काही दिवसांपूर्वी देविकाबरोबर-माझ्या मुलीबरोबर गप्पा मारत असताना ती म्हणाली, ''बाबा, कसलं ग्रेट पुस्तक आहे रे हे काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस'!'' मी चमकून विचारलं, ''तू कुठं वाचलंस?'' तशी ती म्हणाली, ''माझ्याकडे किंडलवर आहे.'' त्यावर काही न बोलता मी किंडल ताब्यात घेतलं आणि सरळ वाचायला सुरुवात केली. लघुकादंबरी ... किंवा दीर्घकथेचा अवकाश असलेलं हे पुस्तक मी झपाट्यानं वाचून हातावेगळं केलं. मात्र या पुस्तकातला आशय व शीर्षकाचा अन्वयार्थ समजायला, आणि कथानकातील विचित्र परिस्थितीच्या आघातामुळे मनाला आलेलं बधीरपण ओसरायला काही काळ जावा लागला. मग मी काफ्काचं जीवनचरित्र वाचून काढलं. 'मेटॅमॉर्फोसिस' ही लघुकादंबरी 'एक्झिस्टेंशिॲलिझम' म्हणजे अस्तित्ववादी विचारसरणीवर आधारित असल्याचं जाणवल्यावर किर्केगार्द, सार्त्र, कामू वगैरेंची आठवण काढली. इंटरनेटवर 'मेटॅमॉर्फोसिस'वर केलेल्या काही उत्कृष्ट फिल्म पहिल्या. इतर लेखन-वाचन चालू असलं, तरी मनात 'सेकंड ट्रॅक'वर सतत 'मेटॅमॉर्फोसिस''वर चिंतन चालू असायचं. दरम्यान 'मॅजेस्टिक'नं माझं 'बिंब-प्रतिबिंब' हे जागतिक पातळीवर गाजलेल्या तेरा थोर साहित्यकृतींचा आस्वादक परिचय करून देणारं पुस्तक प्रकाशित केलं. ऑस्कर वाइल्ड, सॉमरसेट मॉम, आयन रँड, अल्बेर काम्यू, जॉर्ज ऑर्वेल, विल्यम गोल्डिंग अशा अनेक थोर लेखकांच्या साहित्यकृतींवर या पुस्तकात लेख असले, तरी काफ्काच्या 'मेटॅमॉर्फोसिस'वर लिहायचं राहून गेलं होतं.

काही दिवसांपूर्वी पुन्हा एकदा 'मेटॅमॉर्फोसिस' वाचून काढलं आणि जाणवलं, की आता या श्रेष्ठ पुस्तकावर आणि त्याच्या लेखकावर लिहायलाच हवं. आणि मग मी 'ललित'च्या २०१९च्या दिवाळी अंकात 'काफ्काचं मेटॅमॉर्फोसिस : एक विलक्षण अनुभव' या शीर्षकाचा दीर्घ लेख लिहिला. हा लेख आवडल्याचं अनेक जणांनी कळवलंच, पण त्याशिवाय या विलक्षण कथानकाचा मराठीत अनुवाद करण्याची विनंती केली. मी 'मेटॅमॉर्फोसिस' या शब्दाचा मराठी अर्थ 'रूपांतर'

असा निश्चित केला आणि उत्साहानं या कादंबरिकेचा अनुवाद करायला घेतला. दरम्यान ‘ललित’मधील लेख आवडल्याचं कळवतानाच सुप्रसिद्ध लेखक श्री. विवेक गोविलकर यांनी ‘सॅम्सा इन लव्ह’ ही हारुकी मुराकामीची कथा वाचायची शिफारस केली. काफ्काच्या कथानकावरचा हा भन्नाट ‘सिक्वेल’ मला आवडला. मी त्यावरही ‘ललित’ २०२०च्या दिवाळी अंकात ‘मुराकामीचा सॅम्सा प्रेमात पडतो’ असा दीर्घ लेख लिहिला. तोही आवडल्याचं अनेक जणांनी आवर्जून कळवलं.

आता काफ्काच्या ‘मेटॅमॉर्फोसिस’चा केवळ अनुवाद न करता, त्याच्या आस्वादक विश्लेषणाबरोबर काफ्काच्या आयुष्याचा, त्याच्या साहित्यसंपदेचा सर्वंकष आढावा घ्यावा, असं वाटू लागलं. ‘काफ्काएस्क’ कलाकृतींचा म्हणजेच काफ्काच्या ‘मेटॅमॉर्फोसिस’चा प्रभाव असणाऱ्या किंवा तिच्याशी नातं सांगणाऱ्या साहित्यकृतींचादेखील या पुस्तकात समावेश करावा, असं वाटू लागलं. ‘पद्मगंधा’चे कै. अरुण जाखडे यांच्याशी एकदा माझ्या या संकल्पित पुस्तकाविषयी बोलत होतो. तेव्हा त्यांनी सुप्रसिद्ध लेखक त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी अनुवाद केलेल्या गुस्ताव यानुश लिखित ‘काफ्काशी संवाद’ हे पुस्तक मला भेट दिलं. या पुस्तकात डेव्हिड गार्नेटच्या ‘लेडी इंटु फॉक्स’ या कादंबरीचा संदर्भ आला आहे. या कादंबरीत एका तरुणीचं रूपांतर कोल्हीत होते. इंटरनेटवर या पुस्तकाची संहिता वाचून मी संकल्पित पुस्तकात या रूपांतरावरही लिहायचं ठरवलं.


मग मी सजगपणे पुस्तकं, नियतकालिकं, इंटरनेट अशा विविध माध्यमांतून काफ्काच्या ‘मेटॅमॉर्फोसिस’शी नातं सांगणाऱ्या ‘काफ्काएस्क’ साहित्यकृतींचा पद्धतशीर अभ्यास सुरू केला. यामध्ये मला आयनेस्कोचं माणसांचं गेंड्यात होणाऱ्या रूपांतराविषयीचं ॲब्सर्ड नाटक ‘रायनोसोरस’; माणसाच्या शरीरात झुरळं शिरल्याची


अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज
सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या -
आपले अवघे आयुष्य विद्युतविज्ञानात झोकून देणाऱ्या -
मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध!

निकोला टेस्ला
रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)



कथा सांगणारी मॅक्युअनची कादंबरी 'द कॉक्रोच'; तसेच विलास सारंगांची एका तरुणाचं शिस्नात होणाऱ्या रूपांतराची कथा सांगणारी 'रूपांतर'; जी. ए. कुलकर्णी यांची 'काफ्काएस्क' भासणारी कथा 'स्वामी'; आणि वसंत आबाजी डहाके यांची कविता 'फ्रान्झ काफ्का, डिसेंबर १९६७' अशा आणखी काही साहित्यकृती पाहण्यात आल्या. या सर्वांचा अभ्यासपूर्ण समावेश या 'काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस' : न संपणारं गारूड' या आस्वादक विश्लेषणात करावा, असं वाटलं. आणि यातूनच हा केवळ अनुवादच नव्हे, तर काफ्काच्या 'मेटॅमॉर्फोसिस'च्या विविध पैलूंची सांगोपांग चर्चा करणारा ग्रंथ सिद्ध करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

माझं भाग्य असं थोर, की माझा भाऊ संजयच्या ओळखीमुळे काफ्काचे गाढे अभ्यासक आणि थोर साहित्यिक श्री. वसंत आबाजी डहाके यांनी अतिशय मर्मग्राही प्रस्तावना आनंदानं लिहून पाठवली. त्यांच्या कौतुकाच्या शब्दांनी माझा हुरूप वाढवला. 'राजहंस प्रकाशन' हे मराठी साहित्यविश्वातील प्रतिष्ठित नाव आहे. 'काफ्काच्या मेटॅमॉर्फोसिस'विषयी विशेष आस्था असणारे 'राजहंस'चे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत तयारी दर्शवली आणि पुस्तकाचं आस्थेनं संपादन केलं.

डिसेंबर २०२३मध्ये हे पुस्तक प्रकाशित झाल्यापासून औरंगाबाद, नगर, मुंबई, पुणे अशा विविध ठिकाणांहून जाणकार आणि रसिक वाचकांनी पुस्तक आवडल्याचं फोनवर अथवा प्रत्यक्ष भेटून कळवायला सुरुवात केली आहे. कोथरूड, पुणे येथील श्री. संजय तांबे यांनी फोनवर बोलताना पुस्तकाचं भरभरून कौतुक तर केलंच, पण लेखी परीक्षणवजा विस्तृत प्रतिक्रिया उत्साहानं कळवली. औरंगाबादच्या अथर्व देशमुख यांना तर हे पुस्तक इतकं आवडलं, की त्यांनी त्यांच्या यू ट्यूब चॅनेलसाठी या पुस्तकासंदर्भात माझी मुलाखत लवकरच घेण्याचं निश्चित केलं आहे.



काफ्कावर प्रेम करणारे अनेक साहित्यरसिक आणि 'मेटॅमॉर्फोसिस''चे सजग अभ्यासक हे उत्साहानं या पुस्तकाचं स्वागत करतील, अशी आशा आहे.

***डॉ. सुहास भास्कर जोशी***



## आठवणींच्या खिडकीतून

### घर तिघांचं हवं...

*‘विश्वाचा विस्तार केवढा?*
*ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा’* - कवी केशवसुत

कोणाचे केस कितीही पांढरे झाले असले, कोणी कितीही पावसाळे पाहिले असले; तरी जीवनाविषयीच्या ज्याच्या-त्याच्या अनुभवांना, ज्ञानाला, समजुतीला मर्यादा असतातच. स्वतःच्या आयुष्यातील अनुभव आपल्याला समृद्ध करतात हे खरे. पण आपल्या अनुभवानुसार आणि समजुतीनुसार जीवन म्हणून आपण जे समजतो, त्यापलीकडे जीवन अफाट पसरलेले असते. अशा आवाक्याबाहेरच्या जीवनाचे काही अंश जगभरच्या साहित्यामधून आपल्यापर्यंत येतात आणि जीवनाविषयीची आपली जाणीव विस्तारते, सखोल होते. - साहित्याविषयी असे खूप काही ऐकले आणि वाचले, तरी दर वेळी ते घडतेच असे नाही. त्यासाठी वाटही पाहावी लागते.

रत्नाकर मतकरी ह्यांचे १९९०मध्ये रंगमंचावर आलेले ‘घर तिघांचं हवं’ हे नाटक आजही ताजे वाटते, ते त्यामधील विलक्षण जीवनानुभवामुळे.

डी.एन. आणि प्रमिलाबाई हे विद्याविभूषित पती-पत्नी. मुंबईला राहतात. डी.एन. नावाजलेले कर्तबगार वकील, तर प्रमिलाबाईंनी बालशिक्षणाचे महत्त्व ओळखून शाळा सुरू केलेली. त्यांची बेबी ही मुलगी. पतीपत्नी सुशिक्षित आहेत, इथेच त्या दोघांमधले साम्य संपते. डी.एन. ह्यांनी स्वतःचे एक तत्त्वज्ञान तयार केले आहे की, कशालाही बांधलेले न राहता मुक्तपणे जगायचे. दारू, बाहेरख्यालीपणा, चोरी हे त्याचे दृश्यरूप. एक प्रकारचा मनस्वीपणा आणि विनाशाकडे जाण्याची तयारी. प्रमिलाबाई कौटुंबिक आणि सामाजिक बांधिलकीला आपला धर्म मानणाऱ्या. आपल्या मुलीला तिच्या वडलांपासून दूर ठेवण्यासाठी आणि तिच्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून त्यांनी बेबीला पुण्यामध्ये हुजूरपागा शाळेत घातले आहे.

आपले आईवडील वेगळे राहतात, त्यामुळे शाळेतल्या मुली कुचेष्टा करतात; म्हणून बेबी मुंबईला आईकडे परतली आहे. मुंबईला नोकरी मिळविण्याच्या निमित्ताने त्याच वेळी डी.एन.ही घरी आले आहेत. घर असे तिघांचे हवे, म्हणून बेबी सुखावली आहे.

पण मुंबईला घरी आल्यावरही डी.एन. त्यांचे नेहमीचे सरावलेले आयुष्य जगायला


लागतात. प्रमिलाबाईंना आणि त्यांना सोबत करणारी त्यांची शेजारीण जिजी ह्यांना डी.एन. ह्यांचे उद्योग आणि सवयी अडचणीत आणतात. एका प्रसंगी ते प्रमिलाबाईंवर सुरी उगारतात. 'धावा धावा, पपा आईला मारताहेत' असे ओरडून सांगणारी बेबीच, आईने आपल्याला वडलांपासून तोडले म्हणून आईचा द्वेष करते. आई आणि वडील अशा दोघांकडे खेचली गेलेल्या बेबीचे मन दुभंगते.

डी.एन. ह्यांचे घरात राहणे केवळ बेबीसाठी प्रमिलाबाई सहन करतात. पण नाइलाज होऊन त्या डी.एन. यांना घरातून घालवून देतात आणि अगतिक होऊन, पत्र पाठवून पुन्हा बोलावूनही घेतात. बेबीसाठी पतीपत्नी म्हणून नाही, पण आईवडील म्हणून तरी आपल्याला एकत्र राहायला हवे, असे त्या डी.एन.ना विनवितात. बेभरवशाच्या तडजोडीला तयार होतात. पण तोपर्यंत उशीर झालेला असतो. डी.एन. यवतमाळला एका पाशामध्ये अडकले आहेत. मुंबईला येऊन राहणे त्यांना आता शक्य नाही. ते विनाशाला कवटाळतात.

ह्या ना त्या कारणांमुळे आई-वडलांना दुरावलेल्या बेबीला एकटेपण छळत राहते. त्या एकटेपणात तिची सोबत करते तिचेच शरीर. स्वत:च्या वडलांप्रमाणे सुखाची, चैनीची सवय असलेल्या बेबीचेही विनाशाच्या दिशेने गडगडत जाणे सुरू होते.

प्रमिलाबाई एकट्या मागे उरतात. आई म्हणून पदरी आलेले अपयश एका बाजूला आणि बालशिक्षणाच्या कार्यासाठी राजमान्यता लाभूनही 'आयुष्य ओघळोनी रिक्तहस्त' असल्याची भावना एका बाजूला...

डी.एन. आणि प्रमिलाबाई ह्यांचे टोकाचे परस्परविरुद्ध स्वभाव आणि त्या दोघांकडेही खेचली गेल्याने मनाने दुभंगलेली बेबी - ह्यामुळेच तीन आयुष्ये समांतर धावतील, असे नाटककार मतकरी ह्यांनी नेमकेपणाने हेरले. प्रमिलाबाई ह्या एक आई

मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती.
आग्रही आणि पारदर्शी.
सईंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

**सय**

**माझा कलाप्रवास**

**सई परांजपे**

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

आहेत, शिवाय त्या महत्त्वाचे सामजिक कार्य करताहेत म्हणून नाटककाराने जसे त्यांचे किंचितही उदात्तीकरण केले नाही, त्याचप्रमाणे डी.एन. व्यसनी, बाहेरख्याली असले तरी केवळ एक खलनायक म्हणून त्यांच्याकडे मतकरींनी पाहिलेले नाही. घराबाहेर पडल्यानंतर आठदहा वर्षे गेलेली असूनही डी.एन. परत येतात, तेव्हा घरातल्या शंकर ह्या गडीमाणसासाठी आठवणीने विड्या घेऊन येतात. 'आईवर राग करू नको बबड्या' असे बेबीला समजावतात. ''तू माणूस राहिली नाहीस.'' असे ते तिरीमिरीत प्रमिलाबाईंना ऐकवतात; पण हाताशी असलेले एक लाख रुपये ते आयुष्याच्या अखेरच्या वळणावर प्रमिलाबाईंच्या कार्यासाठी देऊन टाकतात. डी.एन.च्या येण्याजाण्याबरोबर प्रत्येक वेळी प्रमिलबाईंची घालमेल होते. 'माझं मन काठोकाठ भरून येतं, ते डी.एन.वरच्या प्रेमानं' असेही त्या म्हणतात. मनुष्यस्वभावातली आणि नातेसंबंधातली अशी गुंतागुंत आणि त्यामधून उद्भवणारी शोकांतिका म्हणजे 'घर तिघांचं हवं' हे नाटक.


ह्या नाटकाइतकाच त्याचा प्रयोगही अप्रतिम होता. दादरला हिंदू कॉलनीतला एक प्रशस्त फ्लॅट, बॉटलग्रीन रंगाच्या भिंती, समांतर धावणारी डेडोची रेषा, झोपाळा, कर्णा असलेला फोनो - अजित दांडेकरांच्या त्या नेपथ्यरचनेने उत्तम वातावरणनिर्मिती साधली होती. आजही ते नेपथ्य नजरेसमोर जसेच्या तसे येते. त्या प्रयोगातील दिलीप प्रभावळकर (डी.एन.), रिमा लागू (प्रमिलाबाई) यांचा अभिनय तितकाच स्मरणीय होता. दोघेही संयत आणि तितक्याच उत्कट अभिनयासाठी प्रसिद्ध. त्यामुळे त्या प्रयोगात अभिनयाची जशी काही एक मैफिलच जमून आली होती. त्यांना उत्कृष्ट साथ दिली होती सुप्रिया मतकरी (बेबी), वैजयंती चिटणीस (जिजी) आणि मिलिंद फाटक ह्यांनी. मिलिंद फाटक ह्यांनी भूमिका केली होती, प्रमिलाबाईंना त्यांच्या


साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे
केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी
प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे
यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला
पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

समांतर रंगभूमी :
पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)



सामाजिक कार्यात मदत करणाऱ्या 'गोपाळ'ची.

दिलीप प्रभावळकर प्रामुख्याने प्रसिद्ध आहेत, ते त्यांनी केलेल्या हास्यकारक भूमिकांसाठी. रंगभूमीवर, छोट्या पडद्यावर आणि मोठ्याही पडद्यावर त्यांनी केलेल्या हास्यकारक भूमिका ही त्यांची जनमानसातली ओळख. पण गंभीर प्रकृतीच्याही अनेक भूमिका त्यांनी त्याच सहजतेने आणि तितक्याच उत्कटतेने केल्या आहेत, ह्याची म्हणावी तशी नोंद घेतली गेलेली नाही. रंगभूमीपुरता विचार करायचा, तर 'एक झुंज वाऱ्याशी', 'नातीगोती', 'आरण्यक' ही ह्याक्षणी नजरेसमोर येणारी नाटके.

नाट्यप्रयोग संपतो आणि मागे त्याचे काहीही उरत नाही. नाट्यप्रयोगाची ध्वनिचित्रफीत तयार केली, तरी ज्या प्रेक्षकांच्या साथीने आणि साक्षीने नाटक पूर्ण होते, त्या प्रेक्षकांचे प्रतिसाद आणि प्रतिक्रिया ध्वनिचित्रफितीत कुठे ऐकायला-पाहायला मिळतात? - उरतात अस्वस्थ करणाऱ्या फक्त आठवणी.

***माधव वझे***
९६०४८४८०३३


गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि
सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या
चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय
या अंगांनी विचार केला आहे.

गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)





त्यांनी मराठी रंगभूमीला नवं भान दिलं.
त्यांच्या दिग्दर्शनामुळे कलाकारांना नवी दृष्टी आली.
त्या सांगत आहेत,

स्वत:ची आणि मराठी रंगभूमीची कथा.

झिम्मा : आठवणींचा गोफ

विजया मेहता

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## क...
## कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

### फक्त मला

या कवितेचा
अर्थ उमगला
फक्त मला
बाकीचे सारे अडकित्ते
किंबहुना खलबत्ते ॥१॥

मातीमधले प्राणतत्त्व
नाव तिचे कविता
आकारा आले ते
बाकीचे सारे बुडबुडे
वा शब्दांचे सांगाडे ॥२॥

तळ यांनी पाण्याचा
पहा या गाठला
हे बोलघेवडे
स्वत:सी
म्हणती मनकवडे ॥३॥

नेमकेपणाने मी
जाणल्या पातळ्या आशयांच्या
अन् सापडला मजला
आतला पदर कवितेचा
घडले अंतरदर्शन ॥४॥

त्यांना जे कळले
त्या तर धांदोट्या
शब्दांच्या वांझोट्या
त्यांनाही नाही कळले
काय कशासी लिहिले ॥५॥

प्रतिमांच्या जाळीमध्ये
ती हरवुन गेली होती
हळुवारपणे मी
शिल्पे सुदूर करुनि
शिरलो सेंद्रिय गाभ्यामाजी ॥६॥

हतभागी त्या
जनककवीला
नाही दिसले नाही पेलले
ते धनुष्य
मी उचलले लीलया ॥७॥

बाकीचे सारे अडकित्ते
किंबहुना खलबत्ते
माझ्यावाचुन पदोपदी
या कवितेची
चालच अडते ॥८॥

***म. वि. कोल्हटकर***
०२१६२-२३२५०४




या फक्त कविता नाहीत, तर मौनातून उसळून मौनात विसर्जित होण्यापूर्वी मध्यसीमेवर अस्तित्वभान देत निमिषभर रेंगाळलेल्या आशयाची स्मारकं आहेत ही.

## उत्तरार्ध

आसावरी काकडे

किंमत : ₹ ८०/- । (ट. ख. ₹ ५०)



श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णासाहेब बोबडे यांची कविता विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातली. एकीकडे संस्कृत काव्याचे संकेत सांभाळणारी आणि दुसरीकडे पोवाडे व लावण्यांची कास धरणारी, समरांगणात आणि रतिरंगणात सारख्याच चैतन्याने चमकणारी.

## कळो न कळो रे

श्रीनिवास बोबडे

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

## मामाच्या गावाला

### बालमनाला अनुभवसमृद्ध करणारा बालकाव्यसंग्रह

*प्रा. डॉ. प्रकाश सपकाळे यांचा 'मामाच्या गावाला' हा बालकवितासंग्रह गावाच्या निसर्गरम्य परिसराची सफर घडवणारा आहे. बालकवितांमधील अनुभवविश्व हे अजिबात अद्भुतरम्य नाही. स्वप्नरंजक, काल्पनिक प्रदेशापेक्षा वास्तवाचे दर्शन घडवून बालमनात पर्यावरणाविषयी सुसंस्कार घडवणारे आहे. बालमनाला अनुभवसमृद्ध करणारी ही बालकविता आहे.*

डॉ. प्रकाश सपकाळे मराठीचे सेवानिवृत्त प्राध्यापक. 'नवी उषा', 'तावडी माटी', 'एल्गार वंचितांचा' हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह. 'खोप्यामधी खोपा' ही बहिणाबाईंच्या काव्यनिर्मितिप्रक्रियेवरील एमएच्या अभ्यासक्रमात असलेली कादंबरी. साहित्य अकादमीने भारतीय साहित्याचे निर्माते या प्रकल्पांतर्गत प्रसिद्ध केलेली व २४ भारतीय भाषांमध्ये अनुवादित होत असलेला मोनोग्राफ, प्रबोधनकार संत तुकाराम असे विपुल व विविध प्रकारचे साहित्य त्यांच्या नावावर आहे.

'मामाच्या गावाला' हे शब्द कानांवर पडताच लहान मुले आनंदाने उड्या मारू लागतात. मामाच्या गावाला केव्हा जायला मिळेल, याची वाट पाहू लागतात. आधी अनेकदा पाहिलेले मामाचे गाव मनात ठाण मांडून बसलेले असते. स्मरणरमणीय असे गाव, तिथली माणसे, एकोप्याने गल्लीतच - आहे त्या साधनांनिशी आनंदाने क्रिकेट खेळणारी मुले, पावसात हुंदडणारी मुले, नदीच्या पाण्यात मनसोक्त डुंबणारी मुले, गाय-वासरं, बैलजोडी, त्यांच्याशी असलेली बांधीलकी, शेतशिवारात फेरफटका मारताना भिरभिरत्या नजरेने दुर्मीळ दृश्ये टिपत त्याचा संस्कार वर्षभर सांभाळणारे संवेदनशील मन हुरळून जाते. हिरवेगार शेतशिवार पाहून मन उल्हसित होते. शहरात कावळे-चिमण्याही पाहायला मिळत नाहीत. इथे पोपट, साळुंख्या, सुगरण, पारवे असे अनेक पक्षी थव्यांनी पाहायला मिळतात. त्यांची घरटी, खोपे, त्यातील पिलेही दिसतात. सकाळ-संध्याकाळ विजेच्या तारांवर पक्ष्यांची शाळाच भरलेली दिसते.

'मामाच्या गावाला' हा बालकवितासंग्रह बालमनात रुंजी घालत असलेल्या, जपून ठेवलेल्या स्मरणरमणीय अशा वास्तव प्रदेशात घेऊन जातो आणि पुन:प्रत्ययाचा

आनंद देतो. स्वप्नप्रदेशात नव्हे, काल्पनिक, अद्‌भुतरम्य विश्वात नव्हे; वास्तवाचे भान देतो.

*माझ्या मामाच्या गाईचे*
*आहे गोंडस वासरू...*
*दूध पिते चुरूचुरू*

*भुरा तपकिरी लाल*
*... रंग छान*
*पाणीदार... डोळे*
*छान हलवते कान*
*.... .*
*हात लावता अंगाला*
*पाहे हलवून मान*
*हात जिभेने चाटत*
*हंबरून मारी तान*

वासरू मागे मागे फिरू लागतं. त्यालाही लळा लागतो. 'वासराच्या संगे मला वाटे सुखाचा सोहळा' अशी लळा लावणारी लडिवाळ शब्दकळा.

अंगणात कपिला गाय आहे, तशी खिल्लाऱ्या बैलांची जोडी आहे.

*जोडी खिल्लाऱ्या बैलांची*
*तिची मला भारी गोडी*

ही बैलजोडी मामासंगे शेतात वखर, नांगर, कोळपणी अशी सर्व कामे करते, तेव्हा पीक हातात येते. म्हणून बैलांविषयीची कृतज्ञता - भावना पोळ्याच्या दिवशी व्यक्त होते.



परिसराच्या सफाई-स्वच्छतेपासून हवामानबदलाचा संदेश देण्यापर्यंत अनेक प्रकारची मदत पक्षी करत असतात. चला, या पुस्तकात अशा वेगवेगळ्या मित्रपक्ष्यांची ओळख करून घेऊ या.

## पर्यावरणाचे रखवालदार

सुरेशचंद्र वारघडे

किंमत : ₹ ३५/- । (ट.ख. ₹ ५०)

*येता पोळ्याचा हा सण*
*मामा करी बैलपूजा*
*पुरणपोळीचा नैवद्य*
*बैलांसगे होई मजा*

शहरी मुलांना हंगामाच्या दिवसात शेतात जाणं म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. ज्वारी-बाजरीची भरलेली कणसं, त्यांचा हुरडा, मूग, चवळीच्या भरलेल्या दाणेदार शेंगा, भुईमुगाच्या शेंगा, हिवाळ्यात गव्हाच्या ओंब्या, हरबऱ्याचे घाटे असे ताजे ताजे, भाजलेले खाण्यात स्वर्गीय आनंद मिळतो. हिरव्या, पोपटी शेतात मुले हुंदडत असतात.

*हंगामाच्या दिवसात शेतशिवारात जाणं*
*आवडतं मला फार फिटे डोळ्यांचं पारणं ॥*
*---पीक भरलं शिवार बघून भरतं मन*
*होतो खूपच आनंद आवडे शेतात जाणं ॥*

शेतातील पिकांत रमल्यामुळे शहरातील आपल्या गच्चीवर कुंड्यांमध्ये केलेली शेती गावाचा संस्कार जोपासताना तसाच आनंद शहरात मिळवून देते. गच्चीवर ताज्या भाज्या मिळत असल्याने कोणत्याही भाज्या आवडीने खायचा चांगला संस्कार मामाच्या गावाने केला आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात खुल्या मोकळ्या हवेत मन उधानते. प्रसन्न वाटते. हिरवळ आणि पाणी, पाखरे आणि त्यांची मंजूळ आवाजातली गाणी मनाला मोहिनी घालतात. पाखरांचे खोपे, त्यांची पिले, पिलाला चोचीने खाऊ भरवणारी सुगरण, तिचा छानदार खोपा.

*सुगरणीचा हा खोपा किती सुंदर दिसतो*
*झाडावरचा निवारा मोठ्या डौलाने डोलतो*


जैववैविध्य म्हणजे काय, ती नष्ट होण्याची कारणे काय,
अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांची आवश्यकता काय,
हे माहीत करून घेण्यासाठी
नक्की वाचावे असे पुस्तक...

**जैववैविध्य आणि अभयारण्ये**

माधवी भट



किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ५०)

विजेच्या समांतर तारांवर वेगवेगळे पक्षी उन्हात अंग शेकत ओळीने बसलेले असतात. मंजूळ आवाजात एकमेकांना गाण्यातून साद-पडसाद देत असतात. जणू पाखरांची शाळाच भरली आहे आणि ते पाढे म्हणत आहेत.

*तारांवर पक्ष्यांची ही शाळा भरली सकाळी*
*पाढे पाठ म्हणतात मोठ्या स्वरात सगळी ॥*
*पाठ करून कविता गाती मंजूळ सुरात*
*ताना मारता उत्साह गोड किती म्हणतात ॥*

आपली शाळाही अशीच असावी, असे बालमनाला वाटू लागते.

*अशी हवी मला शाळा रोज सुखाचा सोहळा*
*मनसोक्त बागडावे श्वास घ्यावया मोकळा*

घरी ओसरीतही पक्ष्यांची किलबिल सुरू असते. ओसरीत धान्य, भांड्यात पाणी ठेवलेले असते. पक्षी येतात, दाणे खातात. पाणी पितात. गाणी गाऊन उडून जातात भुर्रकन.


*आमच्या या ओसरीत आहे पक्ष्यांचा वावर*
*येती पोपट, कावळे, चिमण्या नि कबुतर*

पक्षी आता भीड चेपल्याने मित्रच झालेत. बोलावले तर लगेच येतातही.

*पक्षी माझे मित्र झाले घालतो मी त्यांना साद*
*पक्ष्यांचा मी दोस्त झालो पक्षी देती पडसाद ॥*

'मामाच्या गावाला' ही शीर्षक बालकविता. बालमनाला मामाच्या गावाची ओढ आहे ती मुबलक पाणी, जलाशये, हिरवळीने नटलेला निसर्ग, पाखरे, गुरे, वासरे यांमुळे. नदीत मनसोक्त डुंबण्याची हौस इथेच भागते.

*झुळझुळ वाहे नदी स्वच्छ गार खूप पाणी*
*झाडांमध्ये पाखरंही गाती किती गोड गाणी*
*माझ्या मामाच्या गावाला.*

पाणी आपल्या शरीराला कोणकोणत्या प्रकारे गरजेचे आहे, इतर सजीवांना त्याची काय मदत होते आणि ते काटकसरीने वापरले नाही, ते स्वच्छ ठेवले नाही; तर काय होईल? चला, जाणून घेऊ या पाण्याविषयी सगळे काही!...

**पाणी सर्वांसाठी**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

दुथडी वाहणारी गिरणा आटलेली, ओकीबोकी झालेली पाहून बालमनही हळहळते. ट्रॅक्टर भरभरून रेती उपसून कुठे नेताहेत? जागोजागी खड्डे पडले आहेत. मुबलक पाणी असणारी नदी बारीक धारेएवढीच कशी उरली? बालमनही मग चिंता व चिंतन करू लागते. नदी, नाले, तलाव, विहिरी पाण्याच्या अतिवापरामुळे आटत चालले. पुढील पिढीसाठी तरी पाणी काटकसरीने वापरायला हवे.

*पाणी म्हणजे जीवन पाणी जणू सोने-नाणी*
*पाण्यामुळे जगतात वनस्पती आणि प्राणी*
*---साठवावे, जिरवावे काटकसर करुनी*
*... थेंब थेंब वाचवणे युक्ती आहे मोठी नामी*
*पुढच्याही पिढीसाठी होई उद्याची बेगमी ।।*

पाण्यामुळेच जीवन आहे. कारखाने, वीज, त्यावर आधारित विकास, सुखसोयी अवलंबून आहेत.

पहिला पाऊस फारच आनंददायक असतो.

*आला पहिला पाऊस सुगंधित झाली हवा*
*सुटे सुवास मातीचा गंध वाटे हवा हवा*

भूमी ओलीचिंब होते. जिवाची काहिली मिटते. मुले पावसात भिजत हुंदडायला लागतात.

*मोर, लांडोर, सारी पाखरं, वासरं*
*आनंदित होती सारे सुखावला मनमोर*

धुलीकण बसल्याने असे वातावरण शुद्ध, प्रसन्न होते. उष्मा कमी होतो.

टी.व्ही., अँड्रॉईड, मोबाईलमुळे गावातही शहरी सुविधा झाल्या आहेत. गल्लीबोळांतील मुले मिळेल त्या, उपलब्ध होईल त्या साधनसामग्रीने क्रिकेट खेळतात. फळीची बॅट, टेनिसचा-रबराचा पोकळ चेंडू, प्लॅस्टिकचा चेंडू, झाडाच्या


नदी, प्राणी, शेते, शाळा आणि अगदी कॉम्प्युटरसुद्धा...
मामाच्या गावातल्या अशा अनेक गोष्टींविषयीच्या
या कविता! त्या तुम्हाला मामाच्या गावाची भन्नाट सफर
घडवून आणतील. चला तर मग...



**मामाच्या गावाला**

डॉ. प्रकाश सपकाळे

किंमत : ₹ ८०/- । (ट. ख. ₹ ५०)

फांद्यांचे स्टंप. सुरू होतो खेळ. गल्लीतले क्रिकेट, त्याचे सोयीस्कर नियम. ज्याची बॅट तोच कॅप्टन. तोच बॅटिंग करणार आऊट झाला तरीही, कारण बॅट त्याची असते.

*गल्लीतल्या क्रिकेटचे नियमही गल्लीतले*
*ज्याची असे बॅट-बॉल त्याची मनमानी चाले*

बाकीचे बॉलिंग, फिल्डिग करण्यातच नाइलाजाने रमणार. बॅटिंगसाठी भांडणे होणार. खेळ मोडणार. मग निवेदकाच्याही मनात येते, मीही मामाला सांगून चांगली बॅट आणेन. कॅप्टन मीच होईन. बॅटिंग मीच करीन. शतक काढेन. सचिन, धोनी होईन. खेळायला विमानाने जाईन.

*धोनी, सचिन होईन विश्वचषक जिंकेन*
*क्रिकेट खेळण्यासाठी विमानाने मी फिरेन*

कॉंप्युटर-साक्षर, डिजिटल-साक्षर निवेदक सारी जोडणी स्वत:च करतो. लॅपटॉपही हाताळतो. इंटरनेटवरून माहिती मिळवून अपडेट राहतो. प्रोग्रामिंग करण्याची त्याची मनीषा आहे. वर्क फ्रॉम होम करणाऱ्या मामासारखाच तोही कॉंप्युटर इंजिनीअर होऊ इच्छितो.

प्रा. डॉ. प्रकाश सपकाळे यांचा 'मामाच्या गावाला' हा बालकवितासंग्रह गावाच्या निसर्गरम्य परिसराची सफर घडवणारा आहे. सर्व रचना या अष्टाक्षरी आहेत. गीतानुकूल आहेत. शब्द साधे, सोपे, सुगम, सहज अर्थबोध होईल असे आहेत. बालकवितांमधील अनुभवविश्व हे अजिबात अद्भुतरम्य नाही. स्वप्नरंजक, काल्पनिक प्रदेशापेक्षा वास्तवाचे दर्शन घडवून बालमनात पर्यावरणाविषयी सुसंस्कार घडवणारे आहे. बालमनाला अनुभवसमृद्ध करणारी ही बालकविता आहे. चित्रकार जगदीश पाटील यांचे रंगीत मुखपृष्ठ व आतील रंगीत चित्रे अतिशय सुंदर आहेत. पुस्तकाच्या सौंदर्यात त्यामुळे वृद्धीच झालेली आहे. छपाई सुबक व सुंदर आहे. मांडणीही उत्कृष्टरीत्या केली आहे.

ईशान, तितिक्षा, ओजस, नेद्ध्या या नातवंडांत; त्यांच्या भावविश्वात एकरूप, समरस होऊन प्रा. डॉ. प्रकाश सपकाळे मुलांत मूल होऊन गेलेले दिसतात. नातवंडांत रमलेल्या कवीच्या काव्यप्रतिभेला नवीन धुमारे फुटले आहेत. संवेदनशील कविमनाचा हा कप्पा नातवंडांच्या निमित्ताने रसिक वाचकांसमोर प्रकट झाला आहे. त्यांचे आणखी सहा-सात बालकवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत, हा आणखी सुखद असा धक्का आहे.

**प्रा. डॉ. रा. गो. चवरे,**
नांदेड सिटी, पुणे
८३०८९ ९८६७२

(*'धमालनगरी'*, बालकुमार दिवाळी अंक २०२३मधून साभार)

## राजहंसी पार

काय घडलं
‘राजहंसी’ नगरीत?

### ‘ग्रंथायन’ पर्वाची सांगता




डावीकडून : डॉ. प्रसाद संकपाळ, मोहन जोशी, पै. रामचंद्र माने, निखिल पंडितराव, चंद्रकुमार नलगे, आमदार श्री. सतेज (बंटी) पाटील, दिलीप माजगावकर, ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता, आमदार श्रीमती जयश्री जाधव, विनय जोशी

ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर तो वाचकांपर्यंत कसा पोहोचवायचा, हा प्रश्न कायमच प्रकाशकांना पडतो. साहित्य संमेलनात ग्रंथ प्रदर्शन भरवणे; ही कल्पना सर्वप्रथम विष्णुपंत भागवत, सदानंद भटकळ आणि पांडुरंग कुमठा शेठ यांच्या गप्पांतून समोर आली. त्यानंतर वितरणासाठी गावोगावी ‘ग्रंथ प्रदर्शन भरवणे’ हा मार्ग समोर आला. त्याला उत्तम प्रतिसादही मिळत होता. ‘ढवळे ग्रंथयात्रा’ व ‘अक्षरधारा ग्रंथयात्रा’ ही त्याची ठळक उदाहरणे.

ग्रंथ वितरणासाठी ‘ग्रंथ प्रदर्शन’ हा उत्तम पर्याय आहे आणि व्यवसायही आहे, या विचाराने साधारण १९७०च्या आसपास कोल्हापुरात ‘ग्रंथायन’ ही चळवळ विजय जोशी यांनी सुरू केली. त्यांना उत्तम प्रतिसादही मिळत गेला. अनेक प्रकाशक त्यांना पुस्तके देऊ लागले. कोल्हापूर आणि परिसरात ते अल्पावधीत ‘ग्रंथायन जोशी’ म्हणून ओळखले जाऊ लागले. वीस वर्षे ही चळवळ व्यवस्थित सुरू राहिली.

सर्व उत्तम सुरू असताना काहीतरी विपरीत घडले आणि ‘ग्रंथायन’वर प्रकाशकांनी

फुली मारली. त्यानंतर बराच काळ लोटला. एके दिवशी राजहंसच्या मुंबई शाखेतील विनायक पणशीकराना फोन आला. 'मी कोल्हापूरहून जोशी बोलतोय, भेटायला यायचं आहे.' ठरलेल्या दिवशी जोशी यांचा मुलगा विनय आला होता. त्यांनी राजहंसची थकलेली रक्कम परत केली, पणशीकर नको म्हणत असतानाही. त्याच वेळी त्याच्याकडून समजले की, विजय जोशी हयात नाहीत. त्यांच्या शेवटच्या काळात ते 'ग्रंथायन'ने भरवलेल्या भव्यदिव्य पुस्तक प्रदर्शनाची वर्तमानपत्रांतील कात्रणे व चित्रे बघत असत. या चित्राला परिपूर्णता आणण्याचा विचार विनय जोशी यांनी केला. 'ग्रंथायन' पर्वाची सांगता कोल्हापुरात पाच दिवसांच्या सांस्कृतिक सोहळ्याने केली. त्यात भव्य असे पुस्तक प्रदर्शन भरवले. 'राजहंस'च्या दिलीप माजगावकर यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने गौरवण्यात आले, तर प्रातिनिधिक म्हणून ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता, ज्येष्ठ लेखक मोहन जोशी आदींचा सत्कार करण्यात आला. खरे तर विनय जोशी यांचा आता ग्रंथ व्यवसायाशी संबंध नाही, पण कृतज्ञतेपोटी त्यांनी हे सर्व केले. 'ग्रंथायन'ची धवल सांगता झाली.

❖

गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर





दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-

(ट. ख. ₹ १००)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा,*
*तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू.*
*प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## 'सीता' - अभिराम भडकमकरांची अनवट कादंबरी

'ॲट एनी कॉस्ट' आणि 'असा बालगंधर्व...' या दोन भिन्न प्रवृत्तीच्या कादंबऱ्या. दोन्हीतली विश्वे वेगळी... खरे तर एकाच परिघाच्या दोन आवरणांची..

एक आतले जे एकेकाळच्या समृद्ध मराठी संगीत नाट्यसृष्टीचे, आणि त्यातल्या श्रीमंत आणि मनोविलासी रसिकाश्रित नायकाचे, ज्याच्यावर रसिकांनी जिवापाड प्रेम केले, त्या बालगंधर्वांच्या विरळ होत गेलेल्या आयुष्याचे चित्रण.. तर दुसरे आवरण ही कादंबरी मालिकाविश्वाच्या धुमसत धुमसत श्रीमंतीकडे वळणाऱ्या, पण आत्मानाशाकडे नेणाऱ्या महत्त्वाकांक्षी जगाचे चित्रण करणारी.. दोन्हींचा मध्यबिंदू मनोरंजनविश्व हाच आहे...

तिसरी 'इन्शाअल्लाह'.. एका पुरातन पण नवे होऊ पाहणाऱ्या शहरांतल्या एका विशिष्ट धर्माच्या मानसिक आंदोलनांची.. तिन्हींचा लेखक एकच... तोही वैविध्यपूर्ण नाटके लिहिणारा नाटककार... अभिराम भडकमकर..

आणि आता एकदम

'सीता'... ही कादंबरी...

त्या तिन्हीपेक्षा वेगळे विश्व..

रामायणावर अनेक कलाकृती विविध माध्यमांतून झाल्यात... अगदी नाटक, सिनेमा ते मालिका आणि आता वेबसिरीजसुद्धा.


संपूर्ण रामायणापासून ते अगदी त्यातल्या व्यक्तिरेखांपर्यंत अनेक पद्धतींचे लिखाण झाले..

सीता कादंबरीत वेगळे काय?

हे वेगळेपण म्हणजे सीतेचे, ती एक विदुषी असल्याचे चित्रण..

सीतेचे ज्ञात व्यक्तिमत्त्व म्हणजे ती त्यागाची मूर्ती... आपली भारतीय संस्कृतीच

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



संगीत जुने असो वा नवे, ‘आपले’ असो वा ‘त्यांचे’,
शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत.
नवी-जुनी गाणी ऐकताना त्यामधील उमजलेल्या
बारकाव्यांची आस्वादकाच्या भूमिकेतून केलेली मांडणी
म्हणजे हे पुस्तक.

### गाता रहे...

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

‘एका दिशेचा शोध’ हे संदीप वासलेकरांचं पुस्तक
इतकं गाजलं की, बारा वर्षांत निघाल्या चोवीस आवृत्त्या!
सुधारून वाढवलेली, **रौप्यमहोत्सवी आवृत्ती!**
यात अद्ययावत माहितीसह वाढवलीत तब्बल १२० पानं!

### एका दिशेचा शोध

संदीप वासलेकर

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)






ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक
तसेच मानसिकही.
हेतू, साधने आणि साध्य काहीही असो,
आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

### आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

त्यागभावनेवर आधारित आहे. सीता ही त्यातील एक आदर्श... म्हणूनच आपली लग्नसंस्था अजूनही मूळ धरून आहे.. आणि हा त्याग स्त्रियांच्याच वाट्याला आला आहे... तशात त्यागासोबत विद्वत्ता असेल, तर मग तर पुरुषाला खूप सावध राहावे लागते..

ही कादंबरी वाचून खरे तर विश्वास बसत नाही की, हिचा लेखक अभिराम भडकमकर आहे. यातली भाषा, यातली वर्णने, यातल्या तात्त्विक-धार्मिक चर्चा, यातल्या नाट्यपूर्ण घटना, त्या उभ्या करण्यासाठी उमटलेला भाषेचा स्रोत; हा आपल्या लेखकमित्रानेच लिहिलाय, यावर विश्वास बसत नाही. कारण त्यातले विश्व आजच्या वास्तवापेक्षा वेगळे आहे. हे असेच असेल कदाचित इतके वाटण्याइतपत तत्कालीन वाटते. असे असताना यातली सीता ही केवळ त्यागभावनेने, पतिविरहाने व्याकूळ, असहाय न वाटता एक विदुषी वाटते. नव्हे आहेच, याची वारंवार खात्री पटत जाते. रामायण माहीत नसलेले कोणीच नसतील इथे.. तरीही या सीतेला पुढे काय म्हणायचे आहे, याची उत्सुकता लागून राहते; हे या लिखणाचे यश आहे...

ही सीता.. तिला एकूण काय वाटतंय हे सांगणारी आहे.. प्रत्यक्ष वाल्मिकींनाही आव्हान वाटणारी ही सीता.. आणि आपल्या नकळत आपण तिच्या पावलांचा शोध घेत जातो. यातल्या सीतेच्या मनातील द्वंद्वंही संकलित न होता ठामपणे प्रत्यक्षात उतरलीत, हा त्यातला लिखित प्रकार वाचकाला मोहून टाकतो हे निश्चित.

***पुरुषोत्तम बेर्डे***

## मी सखा मेघदूत

हर्षदा, पुस्तक फारच सुंदर झालंय!!! म्हणजे कसं आणि किती कौतुक करू, असं वाटतंय मला. सगळ्या बाजूंनी तू विचार केला आहेस... म्हणजे काही म्हणून काही शिल्लक ठेवलं नाहीयेस... इतिहास, भूगोल, पुराण, ज्ञान, विज्ञान सगळं सगळं एका पुस्तकात तू आणलंयस... आणि त्याची इतकी सुरेख सांगड घातली आहेस - म्हणजे असं की आपण इतिहास, भूगोल, शास्त्र हे वेगळे वेगळे विषय म्हणून शिकतो, पण ते विषय एकमेकांशी कसे जोडलेले आहेत आणि सगळं मिळून शेवटी एक अद्वैतच कसं, हेसुद्धा तू या पुस्तकातून सांगितलंस... एक आध्यात्मिक झालर लावून वेगळ्याच उंचीवर नेलंस!!!

सगळ्यात पहिलं म्हणजे मेघाला मानवी रूप देऊन त्याचं मनोगत ही कल्पनाच इतकी भन्नाट आहे! आता मेघदूत का नवीन आहे कोणाला? कित्येक प्रसिद्ध लेखक, लेखिका, कवी होऊन गेले; पण मेघदूताचा सिक्वेल ही कल्पना आत्तापर्यंत

कोणालाच कशी नाही सुचली आणि ती तुला सुचली म्हणजे खरंच काय कमाल आहे!! खरं तर मी मेघदूतही वाचलेलं नाही, त्याबद्दल छोटे-छोटे लेख किंवा तू सादर केलेलं नाटक, डॉक्टर भावे यांची व्याख्यानं यातूनच मी मेघदूत अनुभवलं. असं असूनसुद्धा या मेघाचंच दूतरूपातलं स्वगत इतकं काही मनमोहक झालंय, की मला शब्द अपुरे पडतात. तुझ्या कल्पनाशक्तीला, तुझ्या प्रतिभेला, तुझ्या सखोल अभ्यासाला आणि तुझ्या प्रगल्भ विचारांना एक जोरदार सलाम!!

इतकं माहितीपूर्ण पुस्तक आहे.... बऱ्याच गोष्टी मला नव्यानं समजल्या, बरेच वाक्प्रचार, शब्द खूप छान वाटले; प्रत्येक भावनेच्या विविध, चपखल अशा छटा, वेगवेगळ्या नद्यांची नावं, पर्वतांची नावं, झाडांची-फुलांची नावं, त्यांची वर्णनं.... फार फार सुंदर!!!

लेखनाला एक छान नैसर्गिक गती आणि लय आहे. भाषाशैली आलंकारिक तरीही सहज सुंदर आणि मनाला भिडणारी!!

सात-आठ दिवस पटापट कामं आटपून कधी एकदा पुस्तक वाचायला घेते, असं होत होतं! सखे .. खूप enjoy केलं ‘मी सखा मेघदूत’!


लिहीत रहा... आम्ही आवडीनं वाचूच!

***नीलिमा रानडे किवळकर***

## आरोही - विशेष फूल फुलताना

राजहंस प्रकाशन,

आपण प्रकाशित केलेले, सौ. राजेश्वरी किशोर यांचे ‘आरोही - विशेष फूल फुलताना’ हे पुस्तक नुकतेच वाचण्यात आले. वाचताना मन हेलावून गेले. यापूर्वी

साऱ्याच प्राणिजगताशी मैत्र जुळवणारा स्टीव्ह इरविन
आणि आपल्या या जगावेगळ्या प्राणसख्याला
त्याच्या या सगळ्या साहसी आयुष्यात सर्वस्वी साथ करणारी
टेरी इरविन यांच्या सहजीवनाची विलक्षण सत्यकहाणी.

स्टीव्ह आणि मी

टेरी इरविन

अनुवाद : सोनिया सदाकाळ-काळोखे

किंमत : ₹ ४४०/- । (ट. ख. ₹ ५०)

लेखिकेने लिहिलेले ‘निकोबारची नवलाई’ (याची दुसरी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाल्याचे वाचले.) हे वेगळ्या धाटणीचे, प्रवासवर्णनात्मक पुस्तक होते. अंदमान-निकोबारला डिसेंबर २००४मध्ये त्सुनामी आणि भूकंपाने जो विध्वंस केला व त्यातून ज्या धीरोदात्त लोकांनी या बेटांना पुन्हा पूर्वीसारखे वैभव प्राप्त करून दिले, त्याबद्दल लेखिकेने खूप लोकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन; त्यांचे अनुभव, त्यांनी केलेल्या मदतीमुळे बेटांचे झालेले पुनर्वसन हे सर्व शब्दबद्ध करून एक उत्तम दस्तऐवज पुस्तकरूपाने वाचकांपुढे ठेवला आहे.

आता ‘आरोही’ या पुस्तकात एक आई म्हणून आपले पहिले अपत्य हे एक विशेष मूल (दिव्यांग) आहे, असे लक्षात आल्यानंतर अनेक शारीरिक आणि मानसिक व्याधींशी झगडणाऱ्या आपल्या कन्येचे संगोपन केले व आजही या ३ फेब्रुवारी १९९५ला जन्माला आलेल्या आपल्या लाडक्या परीला २८ वर्षे ज्या कठीण परिस्थितीत वाढवून उत्तम संगोपन करीत आहेत, ते वाचताना राजेश्वरी व किशोर या दांपत्याचे, त्यांच्या धीरोदात्तपणाचे, सहनशीलतेचे कौतुक करावेसे वाटते. हे पुस्तक वाचताना मन भरून येते व दुःखही होते.

पती किशोरच्या नोकरीनिमित्ताने वेगवेगळ्या शहरांत, विविध भाषिक प्रांतांत झालेल्या बदल्या, तेथे अनेक लोकांचे आलेले बरे-वाईट अनुभव अर्थात चांगले सहकार्य करणारी माणसे / कुटुंबे त्यांना लाभली. या सगळ्यातून मार्ग काढून या जोडप्याने आपल्या परीचे लाड व संगोपन केलेले आहे. जवळच्या आप्तांनी, मित्रांनी, शेजाऱ्यांनी, कार्यालयातील सहकाऱ्यांनी खूप मदतीचा हात दिला, सहकार्य केले, रात्री-अपरात्री धावून आले. हा सर्व अनुभव पुस्तकरूपाने राजेश्वरी किशोरने लोकांसमोर सादर केलेला आहे. हे पुस्तक वाचून दिव्यांग वा विशेष मुलांचे संगोपन करणाऱ्या इतर पालकांना मार्गदर्शन होईल. त्या मुलांना समजून घेण्याचा, त्यांच्याकडे


कविकुलगुरू कालिदासाचे ‘मेघदूत’ हे खंडकाव्य
म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा
एक अनुपम अलंकार!
कालिदासाच्या ‘मेघदूता’चा जणू ‘सीक्वेल’ म्हणजे
या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...


**मी सखा मेघदूत**

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट. ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा




हे केवळ एका चित्रकाराचे आत्मकथन नाही, तर हा समाजातील एका वंचित वर्गाचा अस्वस्थ करणारा उद्गार आहे. व्यक्तित्रिणाच्या अंगाने जाणाऱ्या आत्मकथनातून अंतर्मुख करणारा अस्सल वाचनानुभव...

### काळ्यानिळ्या रेषा

राजू बाविस्कर


किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

‘इंजिनीयरिंग मार्व्हल’ म्हणजे आयफेल टॉवर. तो साकारणाऱ्या प्रतिभावान अभियंत्याचे अनेक चढउतारांनी भरलेले, यशोमालिकांनी रंगलेले अन् लोकापवादांनी माखलेले आयुष्य चितारणारे चरित्र!

### आयफेल

सत्यजीत साळवे

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)






एक मध्यमवर्गीय मुलगा परिस्थितीशी झगडत शिकून बांधकाम व्यावसायिक होतो. खाजगीकरण, उदारीकरण अन् जागतिकीकरण यांच्यामुळे त्याच्या आयुष्यात होते उलथापालथ. एका संवेदनशील माणसाच्या आयुष्याची वेधक कहाणी.

### अलवार मनाची हुरहुर

राजीव शास्त्री

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन समाजात निर्माण होईल.

तसे पाहिले तर हे पुस्तक जरी पूर्णत: राजेश्वरी किशोर व आरोही यांच्या वैयक्तिक जीवनावर आधारित असले, तरी एका इंग्रजी लेखकाने म्हटल्याप्रमाणे - As you write more and more personal, it becomes more and more universal.

'राजहंस प्रकाशन' हे विविध विषयांना वाहिलेली व वेगळेपणा असलेली पुस्तके/ग्रंथ प्रकाशित करीत असते. राजेश्वरी किशोरची वर उल्लेखलेली दोन पुस्तके दोन वेगळ्या विषयांवर आधारित आहेत. वाचकांनी दोन्ही पुस्तकांचा जरूर आस्वाद घ्यावा.

***वसंत धुपकर***, कोथरूड, पुणे

## नरभक्षकाच्या मागावर

याआधी मी जिम कॉर्बेटची सगळी पुस्तके आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वाचली होती. ती वाचताना वन आणि वन्यप्राणी यांचेविषयी आत्मीयता निर्माण झाली होती. ६७-६८च्या सुमारास 'बॉर्न फ्री' आणि ७०नंतरच्या दशकात 'ब्यूटिफुल पीपल' हे चित्रपटही पाहिले होते. त्याची मोहिनी इतकी होती की, केनियाभेटीत 'बॉर्न फ्री'ची लेखिका जॉय ॲडमसन आणि तिचे पती राहत असलेल्या वसतिस्थानाला आवर्जून भेटही दिली.

पण तरीही आपण अनुवादित केलेले 'नरभक्षकाच्या मागावर' हे पुस्तक वाचताना याआधी न जाणवलेली आत्मीयता जाणवत गेली. केनेथ अँडरसन हे नाव मी प्रथमच वाचले. साहजिकच आपल्या मनोगतापासूनच या पुस्तकाने पकड घेतली, ती अखेरपर्यंत ढिली पडली नाही. कर्नाटकात फिरल्यामुळे आणि अनुवादाच्या निमित्ताने


त्सुनामीने सर्वांत जास्त घायाळ केले ते निकोबारला,
तरीही पुन्हा त्यावर उमेदीने वसवलेली वस्ती...
अशा या अस्पर्शित, काहीशा ज्ञात, खूपशा अज्ञात भूमीचा
इतिहास, भूगोल आणि लोकसंस्कृती उलगडून दाखवणारे.


निकोबारची नवलाई

राजेश्वरी किशोर




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट. ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा



आपल्या प्रासादिक कलागुणांनी साहित्य, नाट्य, संगीत अन् सिनेमाचा परिसर उजळून काढणाऱ्या सात कलंदर व्यक्तिमत्त्वांना जाणून घेण्यासाठी वाचा...

### शुभ्र काही जीवघेणे

अंबरीश मिश्र

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ १७५/- । (ट. ख. ₹ ५०)


दक्षिण भारतात वेगवेगळ्या ठिकाणी अवघ्या पंचक्रोशीत दहशत माजवणाऱ्या नरभक्षकांना हिमतीनं अन् हिकमतीनं टिपणाऱ्या या निष्णात शिकाऱ्यानं सांगितलेल्या स्वानुभवाच्या थरारक शिकारकथा.


### नरभक्षकाच्या मागावर

केनेथ अँडरसन

अनुवाद : संजय बापट

किंमत : ₹ २७०/- । (ट. ख. ₹ ५०)



‘क्लोज एन्काउंटर्स’मध्ये दिसणारा कामाठीपुरा सत्तर आणि ऐंशीच्या दशकांतला आहे. या पुस्तकातल्या चोवीस भागांतून पुरुषोत्तम बेर्डे आपलं बालपण, पौगंड आणि तारुण्य यांच्या साक्षीनं अनेक माणसांच्या आयुष्यांच्या आत डोकावतात.

### क्लोज एन्काउंटर्स

पुरुषोत्तम बेर्डे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

या पुस्तकातली अनेक गावे आणि भूप्रदेश परिचित आहेत. त्यामुळे मी अधिकच गुंतत गेले. सगळे 'आपले'च वाटत गेले.

हे 'आपले' वाटण्यामागचे एक अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे आपण केलेला अनुवाद! विषयात रस असेल तरच अनुवाद सरस उतरतो, हा माझा अनुभव आहे. मूळ पुस्तक सुरुवातीपासून अखेरपर्यंत वाचकांच्या गळी उतरवणे, याला मी चांगला अनुवाद मानते. आपल्याला हे साध्य झाले आहे.

'राजहंस'ने पुस्तक प्रकाशित करताना काहीही हातचे राखून ठेवलेले नाही. चित्रे वाचनातील लज्जत वाढवतात, तर जागांची रेखाटने आकलनात भर टाकतात.

***उमा वि. कुलकर्णी,***
९४२३५७२५५०

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- पाषाणाचे पाझर — किंमत : ₹ ९५०/-
  विवेक गाडगीळ
- आपले वर्तन आपला मेंदू — किंमत : ४४०/-
  डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर
- रंग रेषांचे सोबती
  मारुती पाटील
  (पुठ्ठा बांधणी) — किंमत : ₹ ३५००/-
  (साधी बांधणी) — किंमत : ₹ १४००/-
- Companion of Colourful Strokes
  Maruti Patil
  (Hardbinding) — किंमत : ₹ ३५००/-
  (Cardbinding) — किंमत : ₹ १४००/-
- फकिरी — किंमत : ₹ ३९५/-
  दत्ता बारगजे

राजहंस प्रकाशन




**'राजहंसी' डिजिटल ॲपवरून तुम्ही काय काय करू शकता?**

- पुस्तकाची छापील प्रत ऑर्डर करू शकता / ई-पुस्तक ऑर्डर करू शकता. विकत घेतलेली ई-पुस्तके वाचू शकता.
- राजहंसच्या बुक क्लबचे सदस्य होऊ शकता; बुक क्लबचे फायदे घेऊन पुस्तके ऑर्डर करू शकता.
- राजहंस प्रकाशन या ॲप्लिकेशनमध्ये (फक्त Android App वर) एक नवीन कल्पनादेखील राबवणार आहे. यात आपण महिन्याचे / वर्षाचे पुस्तकालयाचे पैसे भरू शकता आणि महिनाभर / वर्षभर राजहंसची कोणतीही उपलब्ध असलेली ई-पुस्तके वाचू शकता. एका वेळेस एक पुस्तक या योजनेद्वारे वाचता येईल.
- आपणास ई-पुस्तक विकत घ्यायचे नसल्यास, राजहंस प्रकाशनाची ई-पुस्तके आपण नाममात्र भाडे भरून काही दिवसांसाठीदेखील वाचनासाठी घेऊ शकता. आपल्या आवडत्या व्यक्तीस आपण पुस्तक भेट देऊ शकता.
- राजहंस प्रकाशनाच्या नवीन उपक्रमांसंबंधी माहिती ॲपद्वारे आपल्यास मिळू शकते.
- राजहंस प्रकाशनाच्या लेखकांसंबंधी माहिती, त्यांना आवडलेल्या पुस्तकांबद्दल त्यांची मते, त्यांचे व्हिडिओ आणि बरेच काही...
- आणि हो, आपणपण पुस्तकांबद्दल आपले अभिप्राय ॲपद्वारे आम्हास पाठवू शकता.

GET IT ON Google Play

**अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी**

Download on the App Store

**आयफोन आणि आयपॅडसाठी**

बराच काळ जाहिरात क्षेत्रात काम केल्यावर
ज्येष्ठ चित्रकार मारुती पाटील यांनी
पुण्याच्या अभिनव कला महाविद्यालयात
अध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली ती केवळ
चित्रकलेबद्दलच्या प्रेमामुळे, ओढीमुळे.
जवळ जवळ चार दशके अध्यापनाबरोबरच
स्वत: चित्रनिर्मितीतून त्यांच्यातला चित्रकार त्यांनी जिवंत ठेवला.
‘रंग रेषांचे सोबती’ या त्यांच्या पुस्तकात त्यांच्या कलाप्रवासाचे अनुभव
व त्यांची काही चित्रे आपल्याला बघायला मिळतील.

Companion of Colourful Strokes
Maruti Patil




Hardbinding
Cardbinding


रंग रेषांचे सोबती
मारुती पाटील




पुठ्ठा बांधणी
साधी बांधणी

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

एक सर्वसामान्य माणूस.
सेवेची प्रेरणा व करुणेचा वसा घेऊन
पीडितांसाठी काम करत राहिला.
पडल्या-झडलेल्या आणि
तुटक्या-फाटक्या माणसाला अडचणीतून
मार्ग दाखवण्यासाठी; दिशाहीन वा नाउमेद
झालेल्या तरुणाईला पुढे चालावेसे वाटेल,
मार्ग निघत जाईल, जीवन बदलत जाईल
असा पुढील पिढ्यांना दिलासा मिळेल
या विश्वासातून त्याने केलेला
अनघड प्रवास...




फकिरी
दत्ता बारगजे

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**